शनिवार, १२ नोव्हेंबर २०२२
किंमत ५ रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०२ अंक -९३
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● SATURDAY 12 NOVEMBER 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-93 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-12 ● PRICE-5









# नांदुर मधमेश्वर अभयारण्याच्या सहलीवर देश-विदेशातील पक्षी

आधुनिक केसरी न्यूज

**रामभाऊ आवारे**

**निफाड :** यावर्षी परतीच्या पावसाने हजेरी लावल्याने धरणात पूर परिस्थिती कायम होती. मात्र दिवाळीपासून पावसाने विश्रांती घेतल्याने धरणातील फुगवट्याची पाणी पातळी कमी होऊन पानथळ व दलदल प्रदेश तयार होऊ लागल्याने या हंगामातील नांदूर मधमेश्वर पक्षी अभयारण्यात देश, विदेशातील पक्षांचे आगमन होऊ लागले असून सद्यस्थितीत या पक्षी अभयारण्यात सहा ते सात हजार पक्षी दिसून येत आहे. जात, पंथ, वर्ण, पक्ष भेद विसरून हे पक्षी अभयारण्य परिसरात मुक्त विहार करताना आणि गटागटाने दिसू लागले आहेत. त्यामुळे पुढील काही महिने हा परिसर पर्यटकांनी गजबजणार आहे. महाराष्ट्राचे भरतपूर किंबहुना नुकताच रामसरचा दर्जा प्राप्त झालेल्या येथील पक्षी अभयारण्यात आता पक्षी निरीक्षणासाठी पर्यटकांच्या दुर्बिणी सरसावल्या आहेत. सध्या हळूहळू थंडीची चाहूल लागत असल्याने पक्ष्यांचे देखील आगमन होऊ लागले आहे. वनविभागाने पर्यटकांसाठी येथे निवासस्थाने तसेच रस्ते पर्यटनासाठी ठिकठिकाणी पक्षी निरीक्षणासाठी अत्यावश्यक सुविधा निर्माण केल्या आहेत. तर येथील प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे अनेक पर्यटक येथे माशांचा आस्वाद घेण्यासाठी असतात. त्यामुळे धरण परिसरात हॉटेल आणि मत्स्य विक्रीचा व्यवसाय बहरला आहे. येथील पर्यटकांचे खास आकर्षण असलेले फ्लेमिंगो अर्थात रोहित म्हणजेच जो पक्षी अग्निपथ नावाने ओळखला जातो अशा पक्ष्याला बघण्यासाठी पर्यटक मोठ्या संख्येने येत असतात. कच्छच्या रानातून हजारो किलोमीटरचा प्रवास करीत दरवर्षी फ्लेमिंगो मोठ्या संख्येने येथील अभयारण्यात हिवाळ्यात दाखल होत असतात व हिवाळा संपताच पुन्हा मायदेशी परततात. उंच पाय, लांब सोच, रंगाने सफेद तर पंख सफेद आणि खालील बाजूने लाल आणि मोठे असल्याने हवेत उडताना अग्निच्या ज्वालासारखा दिसतो म्हणून त्यास अग्निपंख म्हणतात. चोचीमध्ये सायन असल्याने आणि उंच पायामुळे हा पक्षी पर्यटकांचे लक्ष वेधून घेतो. तसेच यावर्षी प्रथमच निळ्या गालाचाा वेड्या राघूचे देखील पक्षी अभयारण्यात आगमन झाले आहे. विशेषतः पंजाब, पाकिस्तान आणि राजस्थानमध्ये दिसणारा हा पक्षी उत्तर आफ्रिका आणि मध्य पूर्वेच्या तुर्कीपासून कझहाकीस्तान आणि भारतापर्यंत हा पक्षी प्रजनन करतो. सडपातळ असणारा हा पक्षी रंगाने हिरवा आहे. वनविभागाने पक्ष्यांना बसण्यासाठी खास झाडाच्या आकारांच्या प्रतिकृती निर्माण केल्या आहे. येथील अभयारण्य परिसरात विविध प्रकारच्या जैव वनस्पती देखील आढळतात. तसेच धरणातील पाण्यावर कमळ फुले मोठ्या प्रमाणात तरंगताना दिसतात. एकुणच जसजशी थंडी वाढत जाईल तसतसे पक्षी आणि पर्यटकांची संख्याही वाढत जाणार आहे. त्यामुळे काही दिवस येथील अभयारण्यात पक्ष्यांचा किलबिलाट असतो. सध्या येथे उघड्या चोचीचा करकोचा, साधा करकोचा, काळा शेपटीचा टिपके वाला गरुड, ब्राह्मणी बदक, चमचा, जांभळी पानकोंबडी, खंड्या, थापट्या, कापसी बदल चित्र बलाक, दलदल ससाण, शेकोट्या, काळा शराटी, मोर शराटी, हळदी-कुंकू, वेडा राघू, नकटा बदक, चिमण सेंद्रया, टीबुकली नदी सुरय, चक्रवाल गप्पिदास, श्वेत करकोचा, वारकरी, तुतारी, कोकिळा, चातक, खाटीक, मुनिया, वनचक, हळद्या, साळुंकी, तलवार बदक आदी पक्षांबरोबरच पान कावळा, नोरी, कर्नफुल, जलकुंभी, गोलकुसल, तीली, सदाफुली, लाजाळू, नळीची भाजी, शेराल, जलपिंपली, कोरपड, गोखरू आदी वनस्पती आढळतात. येथील नदीपात्रात बांगुर, तलिफा, मरळ, वांब, कोंबडा, कटला, राहु, मुरंगी, खवल्या, मुरा, पावरा, सिंधी, घोगऱ्या, डोकऱ्या, झिंगा आदी प्रकारचे मासे येथे आढळून येतात.

# सर्व दोषींची सुटका करा

## सर्वोच्च न्यायालय : राजीव गांधी हत्या प्रकरण

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या हत्याप्रकरणात जन्मठेपेची शिक्षा भोगणाऱ्या नलिनी श्रीहरन आणि आरपी रविचंद्रन सह सर्व सहा दोषींची सुटका करण्याचे आदेश आज (११ नोव्हेंबर) सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. यामध्ये एस नलिनी, आरपी रविचंद्रन यांच्यासह संथन, मुरुगन, रॉबर्ट पायास, जयकुमार यांचा समावेश आहे. या प्रकरणातील सातवा दोषी एजी पेरारिवालन याची याआधीच सुटका करण्यात आलेली आहे.**

माजी पंतप्रधान राजीव गांधी हत्या प्रकरणातील नलिनी श्रीहरन आणि आरपी रविचंद्रन यांच्यासह सहा दोषींची सुटका करण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. यामधील नलिनी सध्या पॅरोलवर कारागृहाच्या बाहेर आहे. याआधी मद्रास उच्च न्यायालयाने दोषी नलिनीची सुटकेची मागणी करणारी याचिका फेटाळली होती. त्यानंतर तिने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. याआधी राजीव गांधी हत्या प्रकरणातील दोषी एजी पेरारिवालन याची १८ मे रोजी सुटका करण्यात होती. पेरारिवालन याने राजीव गांधींच्या हत्याप्रकरणात ३० वर्षे शिक्षा भोगलेली आहे. त्याने संविधानातील कलम १४२ चा आधार घेत आपल्या सुटकेची मागणी केली होती. दोषी नलिनीने पेरारिवालनच्या बाबतीत घेण्यात आलेल्या याच निर्णयाचा दाखला देत माझीही सुटका करावी अशी मागणी केली होती. राजीव गांधी यांची एलटीटीईने श्रीपेरंबुदूर येथे २१ मे १९९१ रोजी हत्या केली होती.

## फुलांचा सडा



भारत जोडो यात्रेदरम्यान दोन क्विंटल फुलांचा सडा कित्येक फूट शिंपून सेनी (ता. अर्धापूर) येथे ग्रामस्थांनी राहुल गांधी यांचे खास स्वागत केले.




# भाजप महिला प्रदेशाध्यक्ष चित्रा वाघ पत्रकारावर भडकल्या

आधुनिक केसरी न्यूज

**राहुल वासनिक**

**यवतमाळ :** अन्न औषध प्रशासन मंत्री तथा यवतमाळचे पालकमंत्री संजय राठोड यांच्याबाबत प्रश्न विचारताच भाजप महिला मोर्चाच्या प्रदेशाध्यक्ष चित्रा वाघ चांगल्याच भडकल्या. राज्यातील शिंदे-फडणवीस सरकारमधील मंत्री संजय राठोड यांच्यावर पूजा चव्हाण प्रकरणात आरोप करून आपण त्यांचे राजकीय जीवन उध्वस्त केले नाही काय, असा प्रश्न विचारताच भाजप महिला मोर्चाच्या प्रदेशाध्यक्ष चित्रा वाघ भडकल्या. राज्यातील शिंदे-फडणवीस सरकारमधील मंत्री संजय राठोड यांच्यावर पूजा चव्हाण प्रकरणात आरोप करून आपण त्यांचे राजकीय जीवन उध्वस्त केले नाही काय, असा प्रश्न विचारताच भाजप महिला मोर्चाच्या प्रदेशाध्यक्ष चित्रा वाघ भडकल्या. प्रश्न विचारणाऱ्या पत्रकारास पत्रपरिषदेत का बोलावले?, यापुढे अशा पत्रकारांना आपल्या पत्रकार परिषदेत आमंत्रित करायचे नाही, असा दम स्थानिक भाजप पदाधिकाऱ्यांना दिला. यावेळी चित्रा वाघ आणि पत्रकारांमध्ये चांगलीच खडाजंगी झाली. पत्रकारांनी वाघ यांच्या पत्रकार परिषदेवर बहिष्कार टाकून निषेध नोंदवला. प्रदेशाध्यक्ष पदाची सूत्रे स्वीकारतात चित्रा वाघ विदर्भ दौऱ्यावर निघाल्या. आज शुक्रवारी त्यांनी यवतमाळ येथे भेट दिली. यावेळी स्थानिक विश्रामगृहात आयोजित पत्रकार परिषदेत त्यांनी राज्य सरकारने गेल्या १०० दिवसांत महिलांच्या सन्मानसाठी राबविलेल्या उपाययोजनांची माहिती दिली. यावेळी भाजपच्या वतीने आयोजित भोजनावर पत्रकारांनी बहिष्कार टाकुन निषेध नोंदवित रोष व्यक्त केला.

# उगवतीचे रंग



विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

## सेवाव्रती

आधुनिक केसरी




हा भाग आदिवासीबहुल असल्याने कुपोषणाचे प्रमाण मोठे होते. कुपोषण हे सुद्धा दोन प्रकारचे. अति पोषण आणि कमी पोषण. या भागातील गरीब आदिवासी आपलं आणि त्यांच्या मुलांचं नीट पोषण करू शकत नव्हते. गरिबी, अज्ञान आणि शिक्षणाचा अभाव या त्यातील अडचणी. अशा लोकांना आहाराचं महत्व समजून सांगण्याचं मोठंच काम कुलकर्णी दाम्पत्याने केलं. पाण्याची कमतरता निर्माण झालेल्याना साखर, मीठ पाणी घेण्याचा सल्ला दिला. कुपोषित बाळांच्या मातांना घरीच त्यांना स्वस्तात पोषक आहार कसा देता येईल याचे धडे दिले. साधे गूळ शेंगदाण्याचे लाडू या दृष्टीने मुलांना देता येतील असे सांगितले. अनेक मुले त्यांच्या उपचारामुळे वाचली. अनेक रुग्ण बरे झाले. ती माणसे आजही डॉ कुलकर्णी यांना देवासमान मानतात. डॉ कुलकर्णी यांचा वारसा त्यांचा मुलगा डॉ दर्शन आणि डॉ मालविका आज अगदी समर्थपणे चालवत आहेत.

आदिवासी आणि अशिक्षित लोक आजही सर्वच बाजूनी नागवले जातात याची खंत डॉ अलका कुलकर्णी यांना आहे. त्यांचा कैवार घेणारेच त्यांना लुबाडतात. या भागात आजही चांगली डॉक्टर्सची, चांगल्या शिक्षकांची, इंजिनिअर्सची गरज आहे. काही माणसे चांगले काम करताहेत पण त्यांचे प्रयत्न फार कमी पडताहेत. त्यांचे हात बळकट करायला हवेत.

डॉ अलका कुलकर्णी यांचं ' माझी डॉक्टरकी ' हे पुस्तक अतिशय बोलकं आहे. एका डॉक्टरने हे पुस्तक लिहिलं असलं तरी ओघवत्या आणि साध्या सोप्या भाषेमुळे ते कुठेही कंटाळवाणे किंवा बोजड होत नाही. डॉ अलका वाचकांशी थेट संवाद साधतात. आपल्या मनोगतात त्या तरुण पिढीतल्या डॉक्टरांना अतिशय महत्वाचा संदेश देतात. त्या म्हणतात, ' येथे काही लाईफ नाही असे म्हणणार्यांना मला सांगावेसे वाटते की येथे कामाबद्दल समाधान आहे. जे काम करताना माणसाला समाधान वाटत नाही, ते काम एक ओझे होते. आणि असे काम करणारी व्यक्ती नेहमी दुय्यम दर्जाचे आयुष्य जगते. मला अगदी ओरडून सांगावेसे वाटते की, ' अहो, इकडे बघा - किती काम वाट पाहतेय तुमची. प्रामाणिकपणे काम केलं तरी येथे ' खाऊन पिऊन सुखी राहता येतं. शहरातली दगदग आणि यातायात नाही. अलीकडे जरा स्पर्धा वाढीला लागलीय. पण स्पर्धा हवीच. कारण स्पर्धा नसेल तर माणसाकडून चांगलं दर्जेदार काम होत नाही. '

# आनंदी पहाट



## पैसा हे सधन होण्याचे साधन आहे

आधुनिक केसरी

"पैसा हे साधन आहे, निश्चितच ते साध्य असू नये" हे जरी सत्य असले तरीही ते साधन साध्य करण्यासाठी विविध साधने कशाप्रकारे वापरावीत हे समजून घेणेही सद्यःस्थितीत तितकेच आवश्यक आहे. पैशानीच पैसा मिळवला जातो, एका दृष्टिकोनातून ते अगदी खरेही आहे. पैसा कमवणे, जमवणे तो गमावण्यापेक्षा अधिक कष्टप्रद असते. पैसा कमवायला, जमवायला खूप वेळ लागतो, त्याच्या तुलनेने गमवायला काहीच वेळ लागत नाही. गमवलेला पैसा परत मिळवता येऊ शकेलही, परंतु तो कमवण्यासाठी गमवलेला वेळ मात्र परत मिळवता येत नाही. पैशाच्या बाबतीत लोभाचा विचार न करता लाभाचा विचार करणे जरुरीचे असते. बनाव निर्माण करून पैसा मिळवणे हा अलीकडच्या काळात एक नवीन व्यवसायच झाला असल्याचे दिसून येते. पंचतारांकित हॉटेलमध्ये मोफत सेमिनार आयोजित करून हजारो रुपयांचे प्रशिक्षण एका दिवसांत तेही चार तासांत मोफत उपलब्ध करून दिले जाते. सेमिनारच्या अखेरीस मात्र गलेलठ्ठ पॅकेजची ऑफर देऊन धडधडीत फसवणूक करण्यांत येते. पंचतारांकित हॉटेलमध्ये मोफत मिळालेली मेजवानी, तेथील वातावरण, सूट-बूट घालून दिमाखात तारांकित झगमगाटात वावरणारे आयोजकांचे प्रतिनिधी ह्या सर्वांची भुरळ उपस्थितांना पडल्याशिवाय रहात नाही. बनाव रचून होणारी फसवणूक, लुबाडणूक एखाद्या व्यक्तीचे आर्थिक पातळीवरील व्यक्तिगत जीवन उध्वस्त करू शकते. नवीन व्यावसायिक संधी, ट्रेनिंग, व्यवसाय मार्गदर्शन अशा प्रकारचे सेमिनार आयोजित होत असल्याचे आपल्यापैकी प्रत्येकाने विशेषतः समाज माध्यमातून पाहिले असेल. ह्या जगात मोफत काहीच मिळत नसते, हे माहिती असूनही काहीजण अशा सेमिनारला आवर्जून उपस्थित राहतात, बनावाला बळी पडतात, कालांतराने पस्तावतात नंतर धास्तावतात.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

### जाण साधुसंता | क्षणभर ||

अंगीचे सामर्थ्य | जिंकतो हा खेळ ||
उसणे ते बळ | काय कामी ||१||

अनुभव सांगे | हीताचेच बोल ||
होय त्याचे मोल | जगतात ||२||

अंतरी जागवा | कारूण्य ओलावा ||
लीनतेचा धावा | विठु ऐके ||३||

पाठांतर मुखी | अभ्यासाची कास ||
वाढवी विश्वास | किर्तीमान ||४||

विनय दागिना | शोभे प्रज्ञावंता ||
जाण साधुसंता | क्षणभर ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## "निरुपण"

आधुनिक केसरी


### कृतज्ञता

काय मी सांगू। सांगु तुला कसे।
पहावे तिकडे। रूप तुझे दिसे।
उपकार तुझे। वर्णू काय वाचे।
चंद्रहास मनी। नित्य वसे माये।।



डॉ. चन्द्रहासशास्त्री
सोनपेठकर

## ।। दासबोध स्तवन ।।



### मंगलाचरण

आधुनिक केसरी

मायेमध्ये तीन गुण आहेत व ती साकार आहे. माया म्हणजे सारखा बदल होणे. पंचमहाभूतांचा पसारा म्हणजे माया होय. जे आपल्या डोळ्यासमोर दिसते आणि जो भास मनाला जो भास भासतो हे दोन्ही गोष्टी आपल्याला दिसतात म्हणून त्या माया होय.

माया ही क्षणभंगुर आहे. विवेकाने तिचा शोध घेतला तर ती नाहीशी होते. माया अनेकपणानी भरलेली आहे. विश्वरूपाने ती प्रगट होते.माया विष्णूस्वरूप आहे. त्याच्या सारखी मोहिनी घालणारी आ्हे.मायेच्या विस्ताराला मर्यादा नाही. माया बहुरूप्याप्रमाणे अनेक सोंगे घेते. अनेक प्रकारे व्यक्त होते. माया ईश्वराच्या संगतीत रहाते.ईश्वरचं खरं रूप म्हणजे माया आहे. माया अभंग आहे. सर्व जग मायेच्या मुळे चालते. आपली कल्पना म्हणजे माया आहे. माया कितीही कमी करण्याचा प्रयत्न केला तरी ज्ञानावाचून ती तोडता येत नाही. म्हणून संताचे विचार अंगी असले पाहिजेत. सर्वामध्ये परमेश्वर बघितला पाहिजे. कुणीही कुणाचा राग द्वैश मत्सर करू नये. "मंगलाचरण "या पहिल्या समासात समर्थानी आपल्याला ही शिकवण दिली आहे त्याचे सतत पालन करून जीवन जगण्याचा प्रयत्न करूया.



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

# मनाचे श्लोक

आधुनिक केसरी

**जनाकारणें देव लिळावतारी।**
**बहुतांपरी आदरें वेषधारी।**
**तया नेणती ते जन पापरूपी।**
**दुरात्मे महानष्ट चाण्डाळ पापी।।१२६।।**

**सरळ अर्थ :** जनहितासाठी देव असे अनेक अवतार सहजपणे घेतो. पण त्याचे हे नाना वेषधारी अवतार ज्याना ओळखता येत नाहीत ते लोक पापी, दुष्ट दुरात्मे असतात.

**विवेचन :** या श्लोकापासून पुढे श्रीसमर्थ "नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी" हा पादचरण वापरत नाही, मागील दहा श्लोकांत तो वापरला होता. आता या श्लोकात ते सांगताहेत की देव, मग तो शंकर महादेव असो वा श्री विष्णू असो सर्व जनांसाठी कालपरत्वे आणि आवश्यकतेनुसार निरनिराळे अवतार धारण करत असतो. समर्थ इथे पहिल्या चरणात मुद्दामच 'फक्त भक्तांसाठी' असे म्हणत नाहीत तर जनांकारणे, म्हणजे सर्व जनांसाठी असे म्हणत आहेत. जग हे सुष्ट-दुष्ट, चांगले-वाईट, सज्जन-दुर्जन अशा सर्व प्रकारच्या लोकांनी भरलेले असते. देव जेव्हा अवतार घेऊन येतो तेव्हा तो अवतार फक्त भक्तांनाच दिसेल असे नाही, भक्त नसलेल्यांनाही दिसेल. त्याला सुष्ट बघतील तसेच दुष्टहि बघतील. पुन्हा दुसऱ्या चरणात ते म्हणतात 'बहुतांपरी'. या बहुतांमध्ये 'उडदामाजि काळे गोरे' असणारच. नाही का? तर देवाचा अवतार या सर्वांसाठी असतो. प्रश्न हा आहे की सारेच त्या अवतारातले महात्म्य ओळखू शकतात का? तर याचे उत्तर नाही असेच आहे. तसे असते तर श्रीकृष्णाला मारायचा प्रयत्न कंसाने केला नसता आणि कौरवांनीहि कृष्णाशी वैर पत्करले नसते, प्रभू रामचंद्राचे कैकेयीने वाईट चिंतले नसते. रावणाने रामाशी वैर पत्करले नसते आणि हनुमानाच्या शेपटीला आगहि लावली नसती. असे हे, कंस, कैकेयी, रावण, कौरव, वगैरे लोक, जे त्या त्या अवतारातील महात्म्य, त्यांमधील देवाचे स्वरूप ओळखू शकले नव्हते अशांना आपण दुष्ट, पापी असे म्हणतो. तिसऱ्या आणि चौथ्या चरणात समर्थही तेच म्हणतात. जरी त्यांनी दुरात्मे, महानष्ट, चांडाळ, पापी अशी जहालातली जहाल विशेषणे अशा देवत्व ओळखू न शकणाऱ्यांसाठी वापरली असली तरी आपण 'असे लोक पापाचे धनी असतात' एवढा अर्थ घेतला तरी पुरेसे आहे.

सामान्य माणसासाठी आपल्याकडे सगुणभक्ती सांगितली आहे कारण समोर एखादे प्रतीक असेल तर उपासना करणे त्यास सोयीचे पडते. मागच्या काही श्लोकात भगवंत भक्ताची उपेक्षा करीत नाही, असे वर्णन आहे. त्यामध्ये आपण 'भक्त' असणे अपेक्षित आहे. बाळाला नीट बोलता देखिल येत नसते, त्याला काही झाले तर कळतही नसते, पण बाळ अगदी पूर्ण विश्वासानी आणि निःशंकपणे आई जे काही भरवते ते सहज खाते. लहान बाळाला कोणी चिडवले, कोणी चिमटा काढला, एखादा डास चावला, तर ते बाळ प्रतिकार करू शकत नाही पण आई मात्र आपल्या बाळासाठी कोणताही धोका पत्करायला सदैव तत्पर असते. मग निव्वळ भक्तांसाठी एक नव्हे, अनेक जन्म घेणारा परमात्मा किती दयाळू असेल ? भक्तासाठी जन्म घेणारा देव ही संकल्पनाच मला खूप विशेष आणि अचंबित करणारी आहे.



दास चैतन्य
संपर्क क्र. ८३८००१९६७६

हे भारतातच घडले आहे आणि पुढेही घडेल यात शंका नाही. म्हणूनच भारताला देवभूमी हे सार्थ नामाभिदान आहे असे म्हणता येईल.

भगवंतासमोर जाताना जर मनुष्य आपला अभिमान,आपले लौकिक ज्ञान, आपला मान, आपली बुध्दी आदिंचा मनानी त्याग करून त्या बाळाप्रमाणे सान होऊ शकला तर देव सर्व आणि सर्वोतोपरी काळजी घेईल. भक्ताच्या डोळ्यात पाणी आले तर भगवंतांचे डोळे पाणावतात, असे सर्व संत सांगतात.

मनुष्याने, भक्ताने अशी डोळ्यांत पाणी आणून देवाकडे प्रार्थना केली तर देव भक्तासाठी काय करणार नाही... मग देव नाथांच्या घरचा श्रीखंडया होतो, सखुबाईचे दळण दळतो, शबरीची उष्टी बोर खातो, गोऱ्या कुंभाराला मडकी बनवायला मदत करतो, कबिराचे शेले विणतो, पांडवांच्या घरी उष्टी काढतो, घोड्याचा खरारा करतो...

....तो सर्व करतो....

सर्व संत सांगतात की भगवंतावर आपला पूर्ण विश्वास असेल तर भगवंत आपल्याला खूप काही देईल असे नाही पण तो आपली लाज मात्र नक्कीच राखतो, याबद्दल निश्चिंत असावे.

आज काही स्वतःला पुरोगामी म्हणवणारे काही लोकं अनिनराजकीय नेते सार्वजनिक जीवनात हिंदू धर्माला नावे ठेवतात. मुर्तिपुजेवर टीका करतात आणि हेच लोक स्वतः मात्र तासनतास पूजाअर्चा करतात. इकडे शिक्षणातून सरस्वती देवीचे पूजन, पाटी पूजन बंद करायचे आणि सार्वजनिक रित्या सरस्वती पूजन करायचे असे विविध प्रकार करणारी मंडळी आज समाजात आहेत. अशा लोकांची संगत करून सामान्य मनुष्याचा काय लाभ होणार.... त्यांच्यापासून चार हात दूर राहिलेले बरे, नाही का ? समर्थांप्रमाणे सर्व संत त्रिकाल ज्ञानी असतात हे मात्र खरे....!

भक्तिमार्ग इतका सुलभ असताना कोणी त्याचा अनुभव घेत नसतील आणि विनाकारण नावे ठेवत असतील तर समर्थ अशा लोकांना पापी म्हणणे स्वाभाविक नव्हे काय ?

श्रीतुकाराम महाराज म्हणतात,

हरिचिया भक्ता नाही भयचिंता | दुःख निवारीता नारायण ||१|| नलगे वाहणे संसार उद्वेग | जडो नेदी पांग देवराव ||२|| असो द्यावा धीर सदा | समाधान आहे नारायण जवळीच ||३|| तुका म्हणे माझा सखा पांडुरंग व्यापियले जग तेणे एके ||४||

**|| जय जय रघुवीर समर्थ ||**

# शिक्षणाचा बाजार मांडणाऱ्यांना सर्वोच्च न्यायालयाची चपराक

## शिक्षण हा धंदा नव्हे: आधुनिक केसरीस मान्यवरांच्या समर्पक प्रतिक्रिया

आधुनिक केसरी

"शिक्षण हा धंदा नव्हे.." असे फटकारत सर्वोच्च न्यायालयाने महत्त्वपूर्ण निर्णय दिला. शिक्षणाचे बाजारीकरण करून ज्ञानदानाला ठेच पोहचवणा-या खास टोळ्यांना ही सनसनीत चपराकच म्हणावी लागेल. काही संस्था व्रतस्थ भावनेने कार्य करतात तर काही संस्था केवळ नफेखोरीत गुंतलेल्या दिसतात हे वास्तव लपविता येत नाही. सर्वोच्च न्यायालयाने शिक्षणाचा खरा अर्थ आणि आशय स्पष्ट करणारा दिलेला निकाल निश्चितच आशादायक म्हणावा लागेल. यानिमित्ताने सामाजिक न्यायाचे तत्व अधोरेखित झाले आहे. याच अनुषंगाने आधुनिक केसरीस" शिक्षण हा धंदा नव्हे " असे सांगत मान्यवरांकडून प्रतिक्रिया आल्या.





### मनगटाला मस्तकाची जोड द्यावी शिक्षणाने....



प्राथमिक शिक्षणासोबतच माध्यमिक, उच्च माध्यमिक आणि विद्यापिठीय वरिष्ठ शिक्षण जोवर सक्तीचं आणि मोफत होत नाही, तो पर्यंत सद्गुणी मनुष्य निर्माणाचे पवित्र शैक्षणिक कार्य फलदायी होणे नाही.शिक्षण हे केवळ पैसा कमावण्याचं साधण समजून भाराभर संस्था स्थापण करुन फिस आणि डोनेशनच्या माध्यमातून राजरोस पिळवणूक सुरु आहे.सरकार आलं की कार्यकर्त्यांना रोजी रोटी मिळवण्याची साधणं समजून वाटल्या जात आहेत शाळा महाविद्यालये कायमस्वरुपी संपुर्ण विनाअनुदान तत्वावर, जिथं ना कसली शैक्षणिक सुविधा, ना कसला प्रशिक्षीत शिक्षक वर्ग, शिक्षक भरतीला ना कसलं आरक्षण ना विद्यार्थ्यांना कसली आर्थिक सवलत. सक्तीने वसूली मोहिम राबवून पालकांचे कंबरडे मोडणारे नॉनग्रँटचे जाळे वरचेवर घट्ट होत चालले आहे. किमान संविधानातील आपले हक्क आणि कर्तव्य समजू शकतील येवढी साक्षरता करायलाही जर शाळा महाविद्यालये भली मोठी फिस आकारत असतील तर गोरगरीबांनी शिक्षणंच सोडून द्यायचं का ? असा समाजाचा फार मोठा भाग अज्ञानी ठेऊन खरंच समाजाचा हवा तसा विकास होणार आहे का ? विवेकपूर्ण विकासाचं स्वप्न पहाणं हल्ली ब-याच अंशी मुळापासून उपटून पडलं आहे.याला अर्थातच कांही विवेकपूर्ण भूमीका घेऊन कार्यरत असलेल्या मानुसकीच्या शैक्षणिक संस्था अपवाद आहेतच. सगळ्या शक्यता संपल्यावर उद्विग्न होवून माणुस शेवटी न्यायालयाचीच पायरी चढंत असतो. अशा टोकाच्या अगतीकतेला जवळचं वाटणारं शेवटचंच तर टोक असतं 'न्यायालय'. परंतू नितांत कोडगी वृत्ती असलेली मंडळी यालाही जुमानत नाही. समग्र लोकशाहीचाच डोलारा टिकतो की नाही हा खरा प्रश्न या अशा मानलिकतेनं निर्माण केला आहे.सन्मित्रहो ! तशी ती सगळ्याजागी सुक्ष्म स्वरुपात पडद्याआड आहेच.परंतूएकदाका या हुकुमशाहीनं जगजाहिर बूड टेकवलं की संपलंच हो, त्यामुळं जागे व्हा ! शेवटी इतकंच म्हणेन मी माझ्या गजलेच्या भाषेत..."मनगटाला मस्तकाची जोड द्यावी शिक्षणाने, गगनभेदी झेप घ्यावी पंख झडल्या पाखराने."

प्रा.डॉ. मुकुंद राजपंखे, अंबाजोगाई.



### उन्माद पसरवणाऱ्यांना मिळाली सणसणीत चपराक...



शिक्षण हा घटनेने प्रत्येकाला दिलेला मूलभूत अधिकार आहे. शिक्षणाची पूर्तता करून त्याचे योग्य संवर्धन करणे आवश्यक ठरत असताना केवळ लुटीच्या दृष्टीने शिक्षण व्यवस्थेत ठराविक गल्लाभरू धोरणाने प्रवेश केलेले पाहून पोटात प्रचंड आग निर्माण होते. गरिब, वंचित, शोषित आणि कष्टकरी मुलांना पुढे जाऊ न देण्यासाठी व्यवस्थेने केलेली जाणीवपूर्वक व्यूहरचना आहे. त्याचा अनेक प्रकारे अनुभव आपण घेत आहोत. म्हणूनच मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेला हा महत्त्वपूर्ण निकाल शिक्षण व्यवस्थेला चांगलेच फटकारे मारणारा असाच आहे. शैक्षणिक पावित्र्य नष्ट करून विचित्र उन्माद पसरवून पाहणा-या ठराविक मक्तेदारांना ही दिलेली सणसणीत चपराकच म्हणावी लागेल. आता या निर्णयावरच न थांबता शिक्षण क्षेत्रात पसरलेल्या आणि सामाजिक भेदभावाची दरी निर्माण करणा-या प्रवृत्तींचा शोध घेत त्यांच्यावर कठोर कारवाई करणे आवश्यक आहे. तर शिक्षण क्षेत्रात जे उल्लेखनीय कार्य करीत आहेत त्यांना बळ देणे सध्याच्या घडीला आवश्यक वाटते.

- प्राचार्य डॉ.आश्रू जाधव, दारव्हा जि. यवतमाळ

### संघटित लढा उभारून शिक्षणाचे राष्ट्रीयीकरण करा...



माणसातला सुसंस्कृत, स्वाभिमानी आणि त्याचा विवेक जागा करण्याचे सामर्थ्य नक्कीच शिक्षणात आहे, यामुळेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते, 'शिक्षण हे वाघिणीचे दुध आहे. जो प्राशन करेल तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही. संविधानाने शिक्षणाचा मुलभूत अधिकार साऱ्यांसाठी दिला. गरीब शिकु लागला. गुरगुरू लागला. ज्यावेळी ही बाब येथील प्रतिगामी व्यवस्थेच्या नजरेत येत होती, तसतसा शिक्षणाचा व्यवसाय करण्यास येथील व्यवस्थेने सुरूवात केली. आता गुलाम नाहीत, परंतु गरीब आहेत. यामुळे गरीबांपर्यंत अर्थात वाड्या, वस्ती, तांडे, झोपडपट्टी, विटबांधकाम, कारखान्यात काम करणाऱ्या श्रमिकांना शिक्षणापासून वंचित करायचे असेल तर शिक्षण महाग करावे. नेमके या व्यवस्थेने पहिली ते आठवीपर्यत मुलांना शिकवण्याची सक्ती केली. त्यासाठी परीक्षा घेऊ नका, पुढच्या वर्गात ढकला अशीही सक्ती मात्र हळुहळु इंग्रजी शाळा काढून त्या या व्यवस्थेने काबिज केल्या. पुढे उच्च शिक्षणांच्या संधी नाकारण्यासाठी अभिमत विद्यापीठ उभे केले, येथे आरक्षण ही संकल्पनाच नाकारली. जेणेकरून हा गरीब वर्ग शिक्षणापासून दूर राहील. सर्व सार्वजनिक संस्थांचे खासगीकरण करण्यात येत आहे, यामुळे आरक्षणातून शिकणारी पिढीही आता शिकू शकणार नाही. यामुळे देशात आता एक नवा वर्ग तयार करण्यात येत आहे. गरीब आणि श्रीमंत. यामुळे ८५ टक्के वर्गाने संघटित लढा उभारून शिक्षणाचे राष्ट्रीयकरण करून लोकसंख्येच्या तुलनेत त्या समाजातील विद्यार्थ्यांना त्यांच्या शिक्षणाचा हक्क मिळावा. मात्र येथील व्यवस्था शिक्षण हा धंदा झाला असतानाही त्याकडे लक्ष वेधू नये म्हणून मंदिरातील घंटीमध्ये गरीव वर्गाला गुंतवून ठेवण्यात यशस्वी होत आहे. ही त्या व्यवस्थेची खेळी ओळखून दलित शोषित पिडित आदिवासींनी आपल्या घरातील मुलांना देवळातील घंटी वाजव्यास जाऊ न देता शाळेत वाजणाऱ्या घंटीच्या दिशेने पाठवावे.

- केवल जीवनतारे, जेष्ठ पत्रकार, नागपूर

### हा निकाल म्हणजे सकारात्मकेची सुरवात....



आजच्या काळातील शिक्षणा बद्दल बोलायचे झाले तर एका प्रसिद्ध शेर आठवतो.. मेरे हालात ऐसे है की खंजर बेचना होगा मगर सरकारका हूक्म है के सर बेचना होगा पढाई के लिये तो बेचे थे माँ ने जेवर अपने नौकरी के लिये तो शायद घर बेचना होगा आज शिक्षणाच्या नावाखाली सर्रास लूट होत आहे. महाविद्यालयात मॅनेजमेंट अंतर्गत भरल्या जाणाऱ्या फी चे आकडे सर्व सामान्यांना स्वप्नवत आहेत. 11 वी 12 वी चे वर्ग ओस पडले असून खाजगी शिकवणी वर्गात प्रवेश मिळेनासा झाला आहे. मात्र ह्या बाबींचा कोणी विचार करायला तयार नाही. अश्या ह्या परिस्थितीत न्यायालयाने दिलेला निकाल हा सकारात्मकतेचे सुरुवात समजली तरी अजून अनेक गोष्टी बाकी आहेत. खरे तर प्राथमिक ते उच्च शिक्षण खात्याने श्वेत पत्रिका काढून शिक्षण खात्यात पारदर्शकता आणली गेली पाहिजे. एके काळी मधुकर चौधरी ह्यांनी शिक्षण मंत्री असतांना काढलेली श्वेतपत्रिका सोडली तर ते धाडस आजपर्यंत कोणी करू शकले नाही त्यावरून ह्या बाबीतली अनागोंदी सर्वांना कळते हे स्पष्ट होते . मात्र आता जनता सजग होत आहे त्यामुळे शिक्षणाला चांगले दिवस येतील अशी अपेक्षा करूया.

- किरण डोंगरदिवे, मेहकर बुलढाणा

### न्यायालयाच्या निर्णयाची व्हावी अंमलबजावणी...



सर्वोच्च न्यायालयाने 'शिक्षण हा धंदा नव्हे' हा दिलेला निर्णय अतिशय सन्मानपूर्वक कसा आहे. आज आपण पाहतो की ठिकठिकाणी प्रतिष्ठित वर्गाने किंवा पैसेवाल्यांनी शाळा, महाविद्यालये उभारून पैसा कमविण्याचे साधन बनविले आहे. त्यामुळे व्यक्तीच्या ज्ञानाला महत्त्व देऊन नौकरी दिल्यास तो उत्तम प्रकारे विद्यार्थी घडवू शकतो यात शंका नाही. मात्र आज असे संचालक शोधूनही सापडत नाही ही खरी खंत आहे.वैराग्यमूर्ती गाडगेबाबा, कर्मवीर भाऊराव पाटील, पंजाबराव देशमुख यासारख्या समाजसुधारकानी ज्या शैक्षणिक संस्था स्थापन केल्या त्यामागील त्यांचा उद्देश संपत्ती जमा करणे हा नव्हता तर समाजजागृती करून शिक्षण समाजाच्या तळागाळापर्यंत पोहचले पाहिजे यासाठी त्यांची तळमळ होती. आज मात्र आपण पाहतो की ,शैक्षणिक क्षेत्रातील कोणत्याही कामासाठी पैसा(पॉकेट)पुढे केल्याशिवाय काम पुढे सरकतच नाही.त्यातही नौकरीच्या क्षेत्रात तर विचारायलाच नको.साधा चपराशीही घ्यायचा म्हटले तर पंधरा -वीस लाख मोजावे लागतात. शिवाय अलिकडे तर नौकऱ्याच बंद करण्याचा निर्णय सरकारने घेतलाय.परिणामी तरुणाची अवस्था'माय जेवू घालीा आणि बाप भीक मागू देईना'अशी होऊन बसलीय. एवढे केलेच आहे तर तरुणांना पोटापाण्याची सोया करण्याच्या दृष्टीकोनातून जागाही उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतल्यास रे होईल. या अंगाने शिक्षणाच्या संदर्भात दिलेला हा निर्णय अतिशय महत्त्वाचा आहे. या निर्णयाचे स्वागतच करायला हवे.

-डॉ.अनंता सूर, यवतमाळ.

कुमार कार्तिक इंगळे यास
प्रथम वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा
कार्तिक अतुल इंगळे
दि.12/11/2022



शुभेईच्छुक : अतुल भागवत इंगळे(वडील) युवासेना अध्यक्ष
सौ. स्वाती अतुल इंगळे (आई) ग्राम पंचायत सदस्य मोलखेडा, ता.सोयगाव
भागवत सोपान इंगळे(आजोबा), कुसुमबाई भागवत इंगळे (आजी)
सतीश सुधाकर इंगळे(काका), सौ. शितल सतीश इंगळे (काकू)
राहुल समाधान बांगर(मामा), समस्त इंगळे परिवार मोलखेडा ता सोयगाव जि.छत्रपती संभाजीनगर संपर्क : 9552948234 मोलखेडा येथे सायं. 7 वाजता संपन्न होत आहे.

कितीही ज्ञान असले तरी बोलता आले पाहिजे
जालना शहरात
भाषणकलेची
कार्यशाळा
दर रविवारी २ तास, प्रत्यक्ष सरावातून प्रशिक्षण
* व्हाट्सप संपर्क *
विनोद जैतमहाल
9823028332
SPEAKER'S ACADEMY
भाषणकलेची कार्यशाळा
Changing lives since 2016

# प्लेअर ऑफ द टूर्नामेंट

आधुनिक केसरी

आयसीसी टी-२० विश्वचषक २०२२ मधील भारतीय संघाचा प्रवास संपुष्टात आला आहे. परंतु आता आयसीसीकडून दोन भारतीय खेळाडूंना प्लेअर ऑफ द टूर्नामेंटसाठी नामांकन मिळाले आहे. आयसीसीने शुक्रवारी ९ खेळाडूंची यादी जाहीर केली आहे. जे टूर्नामेंटचे सर्वोत्तम खेळाडू बनू शकतात. या यादीत विराट कोहली आणि सूर्यकुमार यादव या दोघांनाही स्थान मिळाले आहे. त्याचबरोबर पाकिस्तानच्या दोन खेळाडूंचाही या यादीत समावेश आहे. याशिवाय इंग्लंडच्या तीन, झिम्बाब्वे आणि श्रीलंकेच्या प्रत्येकी एका खेळाडूला या यादीत स्थान मिळाले आहे. आयसीसी टी-२० विश्वचषक २०२२ चा अंतिम सामना १३ नोव्हेंबर रोजी मेलबर्न क्रिकेट मैदानावर खेळवला जाणार आहे. त्यानंतरच या स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडूचे नाव घोषित केले जाईल. ९ सदस्यीय समितीने २०२२ च्या टी-२० विश्वचषकातील कामगिरीच्या आधारे ९ खेळाडूंची निवड केली आहे. आता चाहत्यांना या ९ खेळाडूंना मतदान करायचे आहे. ज्या खेळाडूला सर्वाधिक मते मिळतील त्याची स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडू म्हणून निवड केली जाईल.
१.या यादीत विराट कोहली अव्वल स्थानावर आहे, ज्याने पाच अर्धशतकांच्या जोरावर सहा डावात २९६ धावा केल्या आहेत. विराट कोहलीने १३६.४० च्या स्ट्राइक रेटने आणि ९८.६६ च्या सरासरीने या धावा केल्या आहेत. विराटने पाकिस्तानविरुद्ध नाबाद ८२ धावांची खेळी खेळली होती. या यादीत सूर्यकुमार यादव दुसऱ्या क्रमांकावर आहे. सूर्याने सहा सामन्यांत १८९.६८ च्या स्ट्राइक रेटने २३९ धावा केल्या. यादरम्यान सूर्याने तीन अर्धशतके झळकावली आहेत. सूर्या यावेळी आयसीसी टी-२० आंतरराष्ट्रीय फलंदाजी क्रमवारीतही अव्वल स्थानावर आहे. शादाब खान या यादीत तिसऱ्या क्रमांकावर आहे. शादाबने पाकिस्तानसाठी बॅट आणि बॉल या दोन्हीद्वारे दमदार कामगिरी केली आहे. दक्षिण आफ्रिकेविरुद्ध पाकिस्तानच्या करो या मरोच्या सामन्यात शादाबने अर्धशतक झळकावून संघाला विजय मिळवून दिला. तसेच गोलंदाजी करताना त्याने अंतिम सामन्यापूर्वी १० विकेट्स घेतल्या आहेत. शादाबचा इकॉनॉमी रेट ६.५९ आहे. या यादीत शाहीन शाह आफ्रिदीचाही समावेश आहे. पाकिस्तानच्या या वेगवान गोलंदाजाची सुरुवात चांगली झाली नाही, पण पहिल्या दोन सामन्यांमध्ये विकेट रहित राहिल्यानंतर आफ्रिदीने अंतिम सामन्यापूर्वी एकूण १० विकेट घेतल्या आहेत. सॅम करण या मेगा स्पर्धेत इंग्लंडसाठी एक्स फॅक्टर ठरला आहे. डेथ ओव्हर्समध्ये त्याची गोलंदाजी अप्रतिम होती. सॅम करनने १० विकेट घेतल्या असून अंतिम फेरीतही त्याच्याकडून याच कामगिरीची अपेक्षा असेल. इंग्लंडचा कर्णधार जोस बटलरने पाच सामन्यांत १९० धावा केल्या आहेत. यादरम्यान त्याचा स्ट्राइक रेट १४३.१६ राहिला आहे. या स्पर्धेत बटलरचे दोन अर्धशतक झळकावले आहे. ज्यामध्ये भारताविरुद्धच्या नाबाद ८० धावांचा समावेश आहे. इंग्लंडसाठी ॲलेक्स हेल्सने ज्या प्रकारे पुनरागमन केले, ते विलक्षण आहे. हेल्स या स्पर्धेत इंग्लंडकडून आतापर्यंत सर्वाधिक धावा करणारा फलंदाज ठरला आहे. हेल्सने १४८.५९ च्या स्ट्राईक रेटने एकूण २११ धावा केल्या आहेत. सिकंदर राजाने अष्टपैलू म्हणून चांगली कामगिरी केली. झिम्बाब्वेला सुपर-१२ मध्ये नेण्यात आणि त्यानंतर पाकिस्तानविरुद्ध विजय मिळवण्यात या खेळाडूचा मोलाचा वाटा होता. सिकंदरने आठ सामन्यांत २१९ धावा केल्या आहेत आणि एकूण १० विकेट्सही घेतल्या आहेत. श्रीलंकेचा स्टार फिरकीपटू वानिंदू हसरंगाने या स्पर्धेत आतापर्यंत सर्वाधिक १५ विकेट घेतल्या आहेत. हसरंगाने ६.४१ च्या इकॉनॉमी रेटने धावा केल्या आणि १३.२६ च्या सरासरीने विकेट घेतल्या आहेत.

# अभिव्यक्तीचे घाऊक ठेकेदार शांत का ?



रवींद्र मुळे
संपर्क क्र : ९४२२२२१५७०

आधुनिक केसरी

**ठाण्याच्या आसपास एक इतिहासाचार्य राहतात . इतिहासातील वेगवेगवेगळ्या गोष्टी जोडून कल्पित कथानके तयार करणे यात हे माहिर आहेत . अर्थात असे स्वतःला इतिहास तज्ज्ञ म्हणून घेणारे विकृत संशोधक महाराष्ट्रात आपला राजकीय स्वार्थ साधण्यासाठी कुणी पाळले आहेत. विशेषतः शिवाजी महाराज यांचा इतिहास हा कसा हिंदुत्ववादी किंवा मुस्लिम सरदारांच्या विरुद्ध नव्हता हे ते सिद्ध करत असतात.**

कुठलेही गड, किल्ले पायी चालून दऱ्याखोऱ्यात खोऱ्यात हिंडून महाराज समजून घेण्यापेक्षा काही लोकांना पदराशी बाळगून संपूर्ण महाराष्टाला ज्ञान पाजळण्यात हे वाकबगार आहेत. तसे नात्याने इशरत जहाँ चे हे मोठे भाऊ लागतात आणि तिच्या शहीद होण्यामुळे तेव्हापासून ते अत्यंत अस्वस्थ असतात . आपल्या अफजलखान , शाहिस्तेखान , सिद्धी वगैरे तमाम पूर्वजांच्या बद्दल बदनामी कारक लिखाण केल्याने कै. बाबासाहेब पुरंदरे सारख्यांचा त्यांना प्रचंड राग आहे. एखाद्या व्यक्तीच्या बद्दल राग आला की त्या व्यक्तीची जात शोधायची आणि मग त्याला , त्या जातीला बदनाम करायचे हा विकृत धंदा यांचा अव्याहत पणे चालू असतो. या निमित्ताने हिंदुत्वाला बदनाम करण्याचा यांचा कंड याना शमविण्यासाठी संधीची वाट ते बघत असतात. अफजलखानाने तुळजाभवानी मंदिर फोडले. गायीच्या कत्तली केल्या . स्त्रियांवर अत्याचार केले. हा या मुंब्रा / ठाणे विद्यापीठाच्या इतिहास विभागाच्या प्रमुख पदावर काम करणाऱ्या या इतिहास तज्ज्ञांच्या दृष्टीने विकृत इतिहास आहे. अफजलखान सीमा संरक्षक म्हणून स्वराज्यात आला होता असा यांचा जावई शोध आहे. महाराष्ट्र पुरोगामी आहे. प्रगतिशील आहे. येथे सर्वांना विचार मांडायची परवानगी आहे असा दावा हे इतिहासाचार्य करतात पण त्यांचा हा दावा फक्त हिंदुत्वाच्या विरोधात विचार मांडणी करणाऱ्यांसाठी आहे . या इतिहासाचार्यांच्या विरोधात कुणी बोलले की मग यांचं पित्त खवळलेच समजायचे . मग बंगल्यावर बोलावणार आणि झोडपून काढणार ! अगदी अफजलखानाचे वंशज असल्यासारखे ! असाच प्रयोग एका मराठी सिनेमाच्या प्रदर्शनात सिनेमा बंद करण्यासाठी या इतिहासाचार्याने आणि त्याच्या पिलावळीने केला . चक्क झुंडशाही करत सिनेमा बघायला आलेल्या प्रेक्षकांना मारहाण करत चित्रपट बंद पाडण्याचा प्रयत्न केला . कुठले चित्रपट दाखववावे , कुठल्या प्रसंगांना टाळावे या बद्दल सरकारची असणारी व्यवस्था या गुंडांना मान्य नाही . आज सर्वत्र बीभत्स पद्धतीने चाललेल्या विकृत OTT प्लॅटफॉर्म वरील अश्लील गोष्टी याना एहर महादेव ' नावाचा सिनेमा म्हणे इतिहासाचे विकृती करण आहे . खरे तर हे ठरवणारा हा टिकोजी राव कोण ? प्रेक्षक निर्णय घेतील ! जेव्हा बॉलीवूड मधील काही सिनेमा जागृत हिंदू समाजाने झिडकारले तेंव्हा तमाम महाराष्ट्रातील पुरोगामी शोकाकुल होऊन रुदाली गान गात होते . अभिव्यक्ती स्वातंत्र्याची बांग देत अग्रलेख , TV शो , YOU TUBE द्वारे छाती बडवत अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या नावांनी गळे काढत होते . अलीकडील काही घटना बघितल्या आणि त्या बरोबर सिनेमा बंद पाडतानाची एकंदर भाषा बघितली तर मुजोर पणा किती वाढला आहे हे लक्षात येते . प्रवीण तरडे , विक्रम गोखले किंवा अन्य काही कलाकारांना गेल्या काही वर्षात आलेले अनुभव बघता चित्रमहर्षी भालजी पेंढारकर यांचा स्टुडिओ जाळणारी वृत्ती पुन्हा डोकवेळ चालतील त्यासाठी ते कधी आंदोलन करणार नाहीत पण हिंदुत्वाशी संबधित काही असेल तर मात्र हमखास विरोध करणार ! वारे अभिव्यक्तीचे शिलेदार ! मावळे कसे होते हे सांगताना चक्क कातड्याच्या रंगावर हा विकृत माणूस गेला . इतके दिवस महापुरुषांच्या जाती शोधण्यात गेल्या आता त्यांच्या अनुयायी , मावळे यांच्या पण जाती शोधतील आणि नवा विकृत इतिहास हे सगळे लिहतील. खरे तर महाराजांच्या




स्वराज्य कल्पनेत दोनच जाती होत्या एक स्वराज्य प्रेमी आणि दुसरी स्वराज्य द्रोही ! त्या मुळे भास्कर कुलकर्णी हा स्वराज्य द्रोही होता तर जीवा महाला स्वराज्य प्रेमी ! सूर्याजी पिसाळ गद्दार , फितूर तर सूर्याजी मालुसरे स्वराज्य भक्त ! याच मालिकेत बाजीप्रभू , मुरारबाजी , तानाजी , शिवा काशीद हे सगळे एकाच जातकुळीचे आणि त्याच वेळेस सगे सोयरे असूनही जावळीचे मोरे किंवा बजाजी हे स्वराज्याचे विरोधक विरुद्ध जात कुळीचे हा महाराजांचा न्याय होता ! पण हा उदात्त विचार जे अखंड राजकारणाच्या शेणात जातीचे किडे निवडत असतात त्यांच्या समजण्याच्या बाहेर आहे. छत्रपती शिवाजी महाराज हे चार साडेचार फूट उंचीचे होते असे प्रतिपादन करताना अफजलखानाच्या शरीर यष्टीचे कौतुक हा गुलाम वृत्तीचा माणूस करत होता. १२००० विजापूरी फौज ३०० मावळ्यांच्या कडून पराभूत होते हे ह्या इतिहासाचार्याला आवडले नसावे म्हणून चित्रपट बंद पाडावा असे त्याला वाटते आहे. अलीकडेच या इतिहास तज्ज्ञांच्या कुलपतीने क्रिकेट मध्ये त्याला नशीब अजमावयला सांगितले आणि मग हा बहाद्दर एरवी शिव्या वाहणाऱ्यांच्या मांडीला मांडी लावून बसला . बरं ते ही सगळे असे हुरळून गेलेल्या मेंढी सारखेच ! त्यामुळे मूळचा उद्धट अधिकच धटिंगण सारखा वागताना दिसू लागला. ' हर के वर काढत आहे. राजकीय आशीर्वादाने वैचारिक दहशतवाद पुन्हा पोसला जात आहे. आम्ही सांगू तो इतिहास आणि आम्ही आखू तो भुगोल ! आम्ही म्हणू तो स्वातंत्र्य लढा आणि आम्ही सांगू तेच फक्त स्वातंत्र्य सैनिक ! ही वृत्ती ७० वर्षे फोफावत गेली . पण आता हे चालणार नाही हे या मंडळींनी लक्षात घेतले पाहिजे . त्या मुळे आता हा दहशतवाद समाज स्वीकारणार नाही आणि यासाठी जाती आणि अन्य सर्व भेद विसरून हिंदू म्हणून समाज उभा राहील हेच सत्य आहे. म्हणून अभिव्यक्तीचे एकतर्फी गळे काढणे आता चालणार नाही. या ढोंगी दुटप्पी मंडळींना ठाण्यात झालेला चित्रपट बंद पाडण्याचा प्रयोग हा मात्र अभिव्यक्तीची कुठलीही गळचेपी वगैरे वाटत नाही आहे कारण ते करणारा , सगळ्या हिंदू विरोधी शक्तीच्या गळ्यातील ताईत आहे ! आमचा तो बाब्या दुसऱ्याचा तो .... ! असा यांचा उद्योग ! त्यामुळे सिनेमा बंद पाडला तरी हे सगळे पुरोगामी मूग गिळून शांत आहेत ! संविधानाच्या शपथा घेणारे आणि दुसऱ्यांना संविधान विरोधी म्हणवणारे पूजनीय बाबासाहेब यांनी बहाल केलेल्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा खून पाडत आहेत पण अभिव्यक्तीचे घाऊक ठेकेदार शांत आहेत ! आता कुणी म्हणतात सिनेमा हिट करण्यासाठी केलेला हा भावे प्रयोग असावा . ते जर खरे असेल तर आम्ही स्वार्थासाठी समाजस्वास्थ्याचा बळी द्यायचा का आणि तेही अशा विकृत लोकांच्या साहाय्याने हा प्रश्न उरतोच ! हा भावे प्रयोग नसावा अशी आशा करू या ! अर्थात अभिव्यक्ती वाले , पुरोगामी , डावे आता शांत का आहेत ? असा जाब विचारण्याची हिम्मत ठेवण्या इतपत हिंदू समाज जागृत आणि जागरूक झाला आहे आणि त्यामुळेच सिनेमा बंद पाडण्याचा प्रयत्न यशस्वी झालेला नाही . म्हणूनच शिव प्रतापदिनाच्या दिवशी या सगळ्यांना प्रतापगडावरील अनधिकृत बांधकाम उध्वस्त होताना बघायची वेळ आली आहे . आता काही दिवसांनी तेथे चालणारा उरूस बंद झाला तर पुन्हा ही पुरोगामी रुदाली गँग रडायला सुरुवात करेलच त्यावेळी आजच्या शांततेची त्यांना हिंदू समाज आठवण निश्चित करून देईल !

# पीएच. डी. संशोधन



डॉ. विजय पांढरीपांडे
मो. 7659084555

आधुनिक केसरी

**भारतातले पीएच. डी. संशोधन हाच संशोधनाचा विषय ठरू शकतो! या विषयावर नव्याने भाष्य करण्याचे कारण म्हणजे नुकतेच यूजीसीने पीएच. डी. प्रबंध सबमिट करण्यापूर्वी पेपर्स पबलिकेशनची अट आता शिथिल केली आहे. आपल्या संशोधनाला दर्जाची मान्यता मिळावी यासाठी स्टँडर्ड जर्नल्समध्ये पेपर्स प्रसिद्ध केले जातात. आंतर राष्ट्रीय जर्नल्समध्ये प्रकाशित होण्यापूर्वी हे संशोधन तीन तज्ञाकडून तपासले जाते. त्याचे महत्व, उपयोगिता, सत्यता, नावीन्य याची छाननी होते.विदेशी विद्यापीठात, आपल्याकडे आयआयटिजसारख्या उच्च शिक्षण संस्थेत अशा पेपर प्रकाशनाला फार महत्व दिले जाते.**

नव्या नोकरी साठी, प्रमोशन साठी आतापर्यंत तरी या संशोधन पेपर प्रकाशनाला महत्व होते. पण गेल्या काही वर्षांत तिथेही भ्रष्टाचार, हेराफेरी सुरू झाली. दर्जेदार जर्नलऐवजी नकली ऑनलाईन जर्नल चे प्रस्थ माजले. संपादक मंडळ नावालाच. तज्ञातर्फे तपासणी, रिव्ह्यू मुळी नाहीच. आले तसे, प्रसंगी चुकासह प्रसिद्ध करायचे हा प्रकार सुरू झाला. राष्ट्रीय, आंतर राष्ट्रीय परिषदामध्ये आपले संशोधन निबंध, पेपर सादर करण्याचीदेखील प्रथा आहे. पण तिथेही व्यावसायिक स्वरूप आले. रजिस्ट्रेशन फीच्या नावाखाली हजारो रुपये गोळा करून परिषदा आयोजित केल्या जातात. या परिषदेत सादर होणारे पेपर देखील आधी तपासणे अपेक्षित असते.पण त्यासाठी तज्ञ हवेत. ते कुठून आणायचे? मग काय पैसे द्या अन् पेपर सादर करा हा धंदा सुरू झाला. आजकाल तर खेडे गावातील महा विद्यालये चक्क आंतर राष्ट्रीय परिषदा आयोजित करतात. नेपाळ, बांगलादेश इथून कुणी आपलेच ओळखीचे बोलवायचे की झाली आंतर राष्ट्रीय परिषद! असा विनोदी कारभार..! म्हणूनच कदाचित अशा पेपर प्रकाशनाला महत्व देणे यू जी सी ने बंद केले असावे. पण संशोधक वाम मार्गाला जात असतील तर त्यात सुधारणा करणे, कडक धोरण स्वीकारणे, नियम शिथिल करण्या ऐवजी अधिक निर्बंध घालणे हे सोडून चक्क दुधात पाणी घालणे सुरू आहे!

एखादी अट अत्यावश्यक केली की ती पूर्ण करण्यासाठी वाटेल ते वाम मार्ग आपल्या कडे शोधले जातात. कारण कुठलेही काम गांभीर्याने करायचे नाही, हा आपला क्याजूअल अप्रोच! विद्यापीठात शिकवण्यासाठी पीएच. डी. अत्यावश्यक केल्यापासून आपल्याकडे संशोधनाचे पेव फुटले. हे तीन चार वर्षात केलेले संशोधन खरेच डॉक्टरेट पदवीसाठी योग्य आहे की नाही हे कसे तपासायचे? त्यातूनच पेपर प्रसिध्द करणे, परिषदातून पेपर प्रेझेनट करणे,अन् नंतर प्रबंध तीन बाह्य तज्ञानकडून तपासून घेणे हे नियम आले. सुरवातीला हे नियम कडक होते. कटाक्षाने पाळले जात होते. हळू हळू त्यात पळवाटा आल्या. पूर्वी विज्ञान तंत्रज्ञान अशा विषयातील प्रबंध देशाबाहेर तपासणीसाठी पाठवले जात. मग त्यात वेळ वाया जातो या सबबीखाली देशातच ते इतर विद्यापीठात पाठवले जाऊ लागले. इथेही ओळखीचे, मैत्रितले परीक्षक निवडणे, त्याला सांगून फेवरेबल रिपोर्ट लिहिण्यास भाग पाडणे, त्यासाठी वेळ पडल्यास संशोधक विद्यार्थ्या कडून पैसे (लाच) घेणे, तोंडी परीक्षा घेण्यासाठी आलेल्या परिक्षकाची स्टार हॉटेल ध्ये सर्व सोय करणे, त्यांना महागड्या भेटी देणे, पर्यटन घडविणे असे प्रकार सुरू झालेत. यापैकी काही बातमी रुपात बाहेर आले. पण बरेचसे झाकल्या गेले.. अगदी आय आय टी चे ७०-८० काळातले नियम अन् आताचे (शिथिल) नियम यात खूप फरक झाला आहे. म्हणजे दुधात बरेच पाणी घातले गेले..दूध नीट पचावे म्हणून!!

पीएच. डी. साठी निवडायचे विषय ह्यात देखील बराच विनोद असतो. फिजिकल एजूकेशन हा विषय घेऊ. एकाच गाईडच्या मार्गदर्शनात एक जण एका जिल्ह्यातील कबड्डी खेळाडूवर योगासनांचा परिणाम या विषयावर संशोधन (!!) करतो. तर दुसरा कबड्डी ऐवजी खो खो हा खेळ निवडतो. तिसरा एका जिल्ह्या ऐवजी दुसरा जिल्हा निवडतो! या सर्व प्रबंधाची अनेक पाने सारखीच. कॉपी पेस्ट हे प्रकार तर इतके वाढले आहेत की मुळात खरे काय हे तपासणे कठीण. प्रामाणिकपणा कुठे राहिलाच नाही. कसा तरी प्रवेश घ्या, कसातरी गाईड निवडा, काही तरी विषय घ्या, कसेतरी पेपर सादर करा, प्रकाशित करा, कसातरी प्रबंध लिहा, कसेतरी तो परिक्षकाकडून क्लिअर करून घ्या अन् शेवटी कशीतरी पदवी मिळवा असे मिडियोकर, प्रदूषित वातावरण आहे आपल्याकडे. नुकतेच एका शिक्षण अधिकाऱ्याचे पीएच. डी. प्रकरण टीवी चॅनेलवर गाजलेले पाहिले. पण अँक्शन शून्य! सारे लवकर विसरले जाते. पेपर प्रकाशित करण्यात देखील अडचणी आहेत. विज्ञान, तंत्रज्ञान, अर्थशास्त्र, मानसशास्त्र, व्यवस्थापन या क्षेत्रात काही चांगले जर्नल्स आहेत. पण सोशल सायन्स, आर्ट्स भाषा (मराठी, हिंदी, संस्कृत, गुजराथी) या विषयात चांगले जर्नल्स नाहीत. आता तर मातृ भाषेत प्रबंध लिहिले जातात. मग ते कुठे कसे प्रकाशित करायचे? यावर काही धंदेवाईक प्रकाशकांनी पैसे घेऊन प्रबंध प्रकाशन (मोजक्या प्रती) करण्याचा बाजार मांडला आहे.
्रमोशन साठी विद्यापीठ त्यालाही मान्यता देतात! ते केले नाही तर एखाद्या संघटनेचे कार्यकर्ते आहेतच मोर्चा घेऊन तयार मदतीला.दबाव आणला की काहीही मान्य करून घेता येते आजकाल.काही निवडून आलेले प्रतिनिधी देखील राजकारण करता करता साईड बिझिनेस म्हणून पीएच. डी. करतात आजकाल. काही नाही तर ओनररी डॉक्टरेट आहेच काहीही न करता मिळवायला! अशी फुकटची पदवी नाकारणारे राहुल द्रविड सारखे विरळाच.

एकूणच पी एच डी पदवी साठीचे संशोधन, त्या संबंधीचे प्रवेशा पासून तर पदवी प्रदान होई पर्यंतचे नियम, संशोधनाची गुणवत्ता, त्याला जागतिक मान्यता मिळावी यासाठीचे प्रयत्न या अतिशय गांभीर्याने घ्यावयाच्या गोष्टी आहेत.कोरे शुध्द दूध पचत नाही म्हणून त्यात पाणी घालणारी आईची माया शिक्षण संशोधनात कामाची नाही हेच खरे!

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# ऊसतोड कामगारांचे पाचटासम जगणे



प्रा. प्रशांत खामकर
संपर्क क्र. 9970423204

आधुनिक केसरी

**महाराष्ट्र सरकारच्या कामगार मंत्रालयामार्फत राबविल्या जाणाऱ्या कामगार कल्याणाच्या अनेक योजनांची माहिती ऊसतोड कामगारांना नसल्याचे दिसते. दुर्दैवाने हे कामगार सरकारी योजनांपासून वंचित राहतात, ही वस्तुस्थिती आहे. 'स्व. गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार महामंडळ' सुरू करण्यात आले आहे. राज्यातील सर्व साखर कारखान्यांना सामावून घेत या महामंडळाच्या माध्यमातून ऊसतोड कामगारांना त्यांच्या कामाचे ठिकाण आणि मूळ गावी भेडसावणाऱ्या अनेक समस्यांची सोडवणूक करण्यासाठी रचनात्मक कार्य होऊन त्यांची आर्थिक उन्नती साधली जाऊन त्यांच्याही जीवनामध्ये अच्छे दिन यावेत हीच माफक अपेक्षा.**

"ऊसामंदी बांधला मी गोड गोड झुला,
झोप-झोप आता माझ्या गोड बाळा;
ऊसामधली जिंदगानी नसो वैऱ्याच्या वाटेला;
कैक खपत्यात पिढ्या; नसतो गोडवा जिंदगीला."

या हृदयस्पर्शी कवितेमधून ऊसतोड कामगारांच्या जीवनाची व्यथा समाजासमोर येते.कडाक्याची थंडी, ऊन, वादळ-वारा, अवकाळी पाऊस, आजारपण, अठरा विश्व दारिद्र्य यांसारख्या अनेक समस्यांना तोंड देत ऊसतोड कामगारांचे काम सुरू असते तेही अविरतपणे. यांचा दिवस पहाटे ४.०० वाजता सुरू होतो.ऊसाची तोडणी, बांधणी आणि वाहनांमध्ये लादनी करता करता दिवस कधी संपतो ते कळत नाही. दिवसाकाठी दोन ते अडीच टनाची गाठ घालण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. त्यावरच त्यांची दिवसाची मजुरी ठरते. राज्यातील वेगवेगळ्या साखर कारखान्यांमध्ये ऊसतोड मजुरीचा दरही वेगवेगळा आहे. त्याची सरासरीही ३७५ रुपये प्रतिटनाच्या दरम्यान येते. याचाच अर्थ या कामगारांना दिवसाकाठी जवळपास ७०० ते ८५० रुपये मजुरी मिळते. असे असले तरी त्यात सातत्य नाही, हेही तितकेच खरे. साखर कारखान्याचा तांत्रिक घोटाळा, नैमित्तिक क्लिनिंग, वाहनाचा घोटाळा, वा हवामानातील बदल यामुळे चार-चार दिवस कामाचे खाडे पडतात. त्या काळात लेकरा बाळांसह स्वतःची उपासमार होते.

महाराष्ट्रात ऊसतोडीचा हंगाम दरवर्षी साधारणतः नोव्हेंबर महिन्यात सुरू होऊन, तो मार्च-एप्रिलपर्यंत चालतो. या पाच-सहा महिन्यांसाठी कामगारांना कामासाठी स्थलांतर करावे लागते. हंगामादरम्यान त्यांना तात्पुरत्या खोपी किंवा पालात राहावे लागते. एका ठिकाणचा ऊसाचा फड संपल्यानंतर दुसऱ्या ठिकाणी बाडबिछाना हलवावा लागतो.

जागतिक क्रमवारीत ब्राझीलनंतर ऊस उत्पादनात भारताचा दुसरा क्रमांक लागतो. भारतामध्ये बऱ्याच ठिकाणी यंत्राद्वारे ऊसतोडणी केली जाते, परंतु जास्त ऊसतोड कामगारांद्वारेच होते. काम किंवा व्यवसायाच्या दृष्टीकोनातून पाहिले, तर ऊसतोडीचे काम सर्व ठिकाणी सारखेच मानले जाऊ शकते. जसे की, कोयत्याने ऊस तोडणे, त्याच्या मोळ्या बांधणे, त्या उचलून आणि वाहून मोठ्या वाहनात भरणे आणि वाहतूक करणे इत्यादी. या कामांत देशागणिक थोडाबहुत फरक मान्य केला तरी ऊस तोडण्यापासून ते वाहनामध्ये भरण्यापर्यंत कामगारच मुख्य भूमिका बजावतात. भारतातच ऊसतोड कामगारांच्या समस्या आहेत आणि इतर देशांमध्ये नाहीत असे नाही. परंतु बाहेरील देशांत काही सकारात्मक आणि महत्त्वाच्या गोष्टी आहेत. त्यांचे अनुकरण करणे भारतातातील, विशेषतः महाराष्ट्रातील ऊसतोड कामगारांचे काही प्रश्न सोडवण्यासाठी उपयुक्त ठरू शकते.

महाराष्ट्रात ऊसतोड कामगार मोठ्या प्रमाणात स्थलांतर करतात. ते अशिक्षित किंवा अर्धशिक्षित असतात आणि गरीब असतात. महिलांचा जवळजवळ पुरुषांच्या बरोबरीने सहभाग



असतो. परंतु बाहेरील देशांमध्ये ऊसतोडणीच्या कामात महिलांचे प्रमाण अगदी तुरळक आहे. काही ठिकाणी तर अजिबातच नाही. विशेषतः गरोदर किंवा नुकत्याच प्रसुत झालेल्या मातांचा सहभाग असण्याचा संदर्भ कोणत्याच संशोधनात आढळत नाही.

ब्राझील, कोस्टा रिका, साल्वाडोर इत्यादी देशांनी ऊसतोड कामगारांबद्दल खोलात जाऊन विचार केला आहे, असे दिसते. त्यामध्ये मुख्यत्वेकरून, कामगारांसाठी संरक्षणात्मक हातमोजे, उष्माघात किंवा उष्णतेचा ताण कमी करण्यासाठी उपायोजना, कामगारांची पोषण स्थिती जपण्यासाठी प्रथिने आणि ऊर्जेचा पुरवठा, ऊसतोडणीआधी आणि नंतरची कामगारांची जीवन गुणवत्ता, किडनीवर होणारे परिणाम, कामगारांसाठी पाणी, विश्रांती, ऊर्जादायी पेये आणि पोषण उपाययोजना इत्यादी गोष्टींचा प्राधान्याने विचार केला जातो.

याउलट महाराष्ट्रामध्ये ऊसतोड कामगारांना कामाच्या ठिकाणी जाण्याची कोणतीच सोय नसते. ऊसतोडणीसाठी दोन- तीन किलोमीटरपर्यंतही चालत ये-जा करावी लागते. त्यामुळे कष्टाचे काम करून आणि कामाच्या ठिकाणी ये-जा करून, अशी दोन्ही बाबतींत या कामगारांना शारीरिक ऊर्जा खर्चावी लागते. आपल्याकडे कामगारांसाठी अल्पोपहार, ऊर्जादायी पेये, प्रथिने हे तर स्वप्नच आहे. प्रकिया केलेले पाणीही लांबचीच गोष्ट. साधे पिण्याचे पाणीही कामगारांना दिले जात नाही. कित्येकदा कामगार दुपारच्या कामानंतर हंडा किंवा बादली घेऊन पिण्याचे पाणी आजूबाजूला शोधतात. शेतातल्या विहिरीतले किंवा नदीतले पाणी पिण्यासाठी वापरतात. ते पाणी स्वच्छ असतेच असे नाही.

या कामगारांना संरक्षक उपकरणे देणे तर लांबच, परंतु टोळीमालक राहण्यासाठी दिलेल्या ताडपत्रीचे आणि ऊसतोडणीसाठी दिलेल्या कोयत्याचेही पैसे वसूल करतात. हे कामगार फाटके आणि जुनेपुराणे कपडे घालून काम करतात. त्यांची मुले बऱ्याचदा ऊसाच्या पाचरटात बिनाकपड्यानिशी आणि उघड्या अंगावर ऊसाचे पाचट कापून पडलेल्या चिरा घेऊन फिरत असतात. विंचू, साप चावणे, कोयता लागणे, वाहन भरती करताना खाली पडणे, उलटी होऊन मृत्यू होणे, यांसारख्या घटनांचा तर ना टोळीमालक विचार करत, ना साखर कारखाने. या सगळ्या गोष्टी कामगारांच्या वैयक्तिक समस्या मानल्या जातात. त्यामुळे त्यांचे उत्तरदायित्व कामगारांवरच ढकलले जाते.

आपल्याकडे कधी कधी असेही ऐकायला मिळते की, कामगार जितके जास्त (रात्रंदिवस) काम करतील, तेवढा जास्त त्यांनाच आर्थिक फायदा होतो. परंतु सत्य हे आहे की, कंत्राटदार आणि टोळीमालकांना आणि त्यायोगाने साखर कारखान्यांना जास्त फायदा होतो. (इथे कामगारांना फायदा होणे म्हणजे फक्त उचल फिटणे किंवा कर्जमुक्त होणे असा आहे)

ऊसतोड कामगारांना कामाच्या आधी आगाऊ रक्कम मिळते, साखरपट्ट्यात काम मिळते, राहायला आणि मोफत पिण्याचे पाणी मिळते, कसेतरी सहा महिने जातात म्हणून ते समाधानी असतात. परंतु ऊसतोडणीसारखे जीवघेणे काम करून त्यांचे आरोग्यच धोक्यात घालत असतात.

ऊसतोड कामगारांबद्दलच्या या स्थूल तुलनात्मक आढाव्यातून एक गोष्ट नक्की स्पष्ट होते की, आपल्याकडे ऊसतोड कामगारांच्या प्रश्नांकडे संशोधनाच्या पातळीवरही सर्वार्थाने बघितले गेलेले नाही. या कामगारांच्या सामाजिक-आर्थिक प्रश्नांबरोबरच या कामामुळे त्यांच्या स्वास्थ्यावर होणारा प्रत्येक परिणाम अभ्यासण्याची गरज आहे. उदा. ऊसतोड कामगारांनी किती तास काम करावे, कसे करावे, सुट्टी कधी घ्यावी, आरोग्यविषयक तपासण्या कधी, कोठे, कशा कराव्या, याबद्दल वैज्ञानिक मार्गदर्शिका तयार करणे महत्त्वाचे ठरू शकते. अजून खोलात जायचे झाले तर ऊसतोडणीच्या हंगामाआधी कामगारांच्या शारीरिक तपासण्या करून हंगामानंतर त्यांच्यात कोणते बदल होतात, हे तपासून त्यानुसार आवश्यक त्या उपयोजना करता येऊ शकतात. अर्थात हे सर्व कामगारांच्या हिताचा विचार साखर कारखान्यांकडून होईल, तेव्हाच शक्य आहे.

उसाचा पट्टा हंगामी, स्थलांतरित कामगारांच्या हाताला काम देतो, ही बाब सकारात्मक असली तरी या कामगारांची स्थिती, त्यांना मिळणारा मोबदला, त्यांची होणारी पिळवणूक आणि या कामाचे त्यांच्या आरोग्यावर होणारे दुष्परिणाम असे अनेक मुद्दे नकारात्मक आहेत. त्यांचा विचार करण्याची गरज आहे.

कामगारांच्या पाल्यांना शैक्षणिक सुविधांची मोठी कमतरता आहे. कामाच्या ठिकाणी शाळेची सुविधा नसल्याचे अनेक कामगारांचे म्हणणे आहे. तर ज्या ठिकाणी शैक्षणिक सुविधा आहेत, त्या ठिकाणच्या पाल्यांच्या शाळेची वेळ, परत येण्याची वेळ, अभ्यास याकडे लक्ष द्यायला पालकांना वेळ नसल्याचे दिसते. याचा एकंदरीत विपरीत परिणाम पाल्यांच्या शैक्षणिक प्रगतीवर होतो. पाल्यांचे शैक्षणिक नुकसान त्यांना परत दारिद्र्याच्या चक्रात लोटणारे आहे, हे सत्यअगदी साखर कारखानदार असो किंवा मायबाप शासन कोणीच ऊसतोड कामगारांच्या समस्यांकडे जातीने लक्ष घालत नाही.

महाराष्ट्र सरकारच्या कामगार मंत्रालयामार्फत राबविल्या जाणाऱ्या कामगार कल्याणाच्या अनेक योजनांची माहिती ऊसतोड कामगारांना नसल्याचे दिसते. दुर्दैवाने हे कामगार सरकारी योजनांपासून वंचित राहतात, ही वस्तुस्थिती आहे. 'स्व. गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार महामंडळ' सुरू करण्यात आले आहे. राज्यातील सर्व साखर कारखान्यांना सामावून घेत या महामंडळाच्या माध्यमातून ऊसतोड कामगारांना त्यांच्या कामाचे ठिकाण आणि मूळ गावी भेडसावणाऱ्या अनेक समस्यांची सोडवणूक करण्यासाठी रचनात्मक कार्य होऊन त्यांची आर्थिक उन्नती साधली जाऊन त्यांच्याही जीवनामध्ये अच्छे दिन यावेत हीच माफक अपेक्षा.


# पक्षीतज्ज्ञ डॉ. सलीम अली




श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**आंतरराष्ट्रीय ख्यातीचे पक्षीतज्ज्ञ डॉ सलीम अली यांचा आज जन्मदिन आहे. पक्षीतज्ज्ञ डॉ सलीम अली यांचा जन्म आजच्याच दिवशी म्हणजे १२ नोव्हेंबर १८९६ रोजी मुंबईत एका गरीब मुस्लिम कुटुंबात झाला. त्यांचे पूर्ण नाव सलीम मोईनुद्दीन अब्दुल अली असे होते. सलीम अली हे एक वर्षाचे असतानाच त्यांच्या वडिलांचे तर दोन वर्षाचे असताना आईचे निधन झाले. अगदी बालवयातच आई वडिलांचे छत्र हरपलेल्या सलीम अलींचा सांभाळ त्यांच्या मामांनी केला. सलीम अली यांना लहानपणापासून पक्षी निरीक्षणाची आवड होती.**



वयाच्या नवव्या वर्षी त्यांनी गळ्यावर पिवळा डाग असलेली चिमणी विकत घेतली होती. हा पक्षी कोणता आहे ? त्याचे नाव काय आहे ? हे त्यांना माहीत नव्हते म्हणून ते माहीत करून घेण्यासाठी ते त्या चिमणीला घेऊन मामांकडे गेले मामांनी सरळ त्याला बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीच्या संचालकाकडे घेऊन गेले. तिथे संचालकांनी सलीम अलींना त्या पक्षाची सविस्तर माहिती सांगितली तसेच संस्थेतील भुसा भरलेल्या पक्षांचा संग्रह दाखवला. तो क्षण डॉ सलीम अलींच्या आयुष्याला कलाटणी देणारा ठरला. त्या क्षणी त्यांच्यावर पक्षांची जी भुरळ पडली ती कायमचीच. त्यानंतर त्यांना पक्षी निरीक्षणाचा छंदच जडला. १९१३ साली मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर डॉ सलीम अली यांनी सेंट झेव्हीयर महाविद्यालयात उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेतला. लहानपणापासून पक्षी निरीक्षणाची आवड असल्याने सलीम अली यांनी उच्च शिक्षणासाठी प्राणी विज्ञान हा विषय निवडला. या विषयात त्यांना बी ए ऑनर्स ही पदवी मिळवली मात्र ही पदवी विद्यापीठाच्या समकक्ष समजली जात नव्हती त्यामुळे त्यांना भारतीय प्राणी वैज्ञानिक सर्व्हेक्षण संस्थेत नोकरी मिळू शकली नाही मात्र बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीत त्यांना व्याख्यता म्हणून नोकरी मिळाली. त्यानंतर ते जर्मनीची राजधानी बर्लिनला गेले तेथे जाऊन त्यांनी पक्षी शास्त्रावर प्रशिक्षण घेतले तिथे त्यांना जगप्रसिद्ध पक्षीतज्ज्ञ एर्व्हिन स्ट्रेझमन यांचे मार्गदर्शन लाभले. त्यानंतर काही काळ इंग्लंडमध्येही काम केले. १९३१ साली ते भारतात परत आले. परत आल्यावर त्यांनी बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीचे उपकार्यवाहक पद स्वीकारले. नंतर ते या संस्थेचे अध्यक्षही बनले. बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीच्या माध्यमातून त्यांनी हैदराबाद पक्षी निरीक्षण, त्रावणकोर - कोचीन पक्षी सर्व्हेक्षण, अफगाणिस्तान पक्षी सर्व्हेक्षण, कैलास पक्षी निरीक्षण यात्रा अशा मोहिमा राबवल्या. डॉ सलीम अली यांनी सुगरण पक्षाच्या वर्तनावर बारकाईने अभ्यास केला व त्यावर बिएनएचएस जर्नलमध्ये एक शोधनिबंध लिहिला. या शोध निबंधाने त्यांना पक्षी शास्त्रज्ञ म्हणून मान्यता मिळवून दिली. डॉ सलीम अली यांनी भारतभर फिरून विविध पक्षांची तपशीलवार माहिती गोळा केली.ती माहिती त्यांनी सर्वसामान्य नागरिकांना समजावी यासाठी पुस्तक रुपात लिहिली. त्यांनी लिहिलेल्या हँडबुक ऑफ इंडिया अँड पाकिस्तान व पिक्टोरियल गाईड या दहा खंडीय पुस्तकाने त्यांचे जगभर नाव झाले. डॉ डीलन रीलपे यांच्या साथीत त्यांनी अपार मेहनत घेऊन भारतीय पक्षांच्या बाराशे जाती, २१०० उपजातींच्या नोंदी, सवयी, शास्त्रशुद्ध सर्वांगीण माहिती चित्रांसाहित एकाच ठिकाणी उपलब्ध करून दिली. डॉ सलीम अली यांच्या ह्याच कार्याने भारतात हौशी पक्षी निरीक्षक बनण्याची परंपरा निर्माण



झाली. भारतातील पक्षी निरीक्षक डॉ सलीम अली यंन्स आद्य गुरू मानतात. त्यांच्या कार्याची नोंद घेऊन भारत सरकारने त्यांना पद्मभूषण पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला तसेच त्यांचा जन्मदिन पक्षीदिन म्हणून साजरा करण्याची घोषणा केली. डॉ सलीम अली यांचे २७ जुलै १९८७ रोजी निधन झाले. डॉ सलीम अली यांना जन्मदिनी विनम्र अभिवादन!

# मनाला स्पर्श करणाऱ्या सत्यकथा



दिलीप देशपांडे
मो.नं. ८९९९५६६९१७

आधुनिक केसरी

**मागील वर्षी संदीप रामराव काळे.यांचे मु.पो.आई.हे पुस्तक वाचले होते.कथा कादंबरी पेक्षा वेगळे काही वाचण्याचा आनंद मिळाला. तसे ते पुस्तक खूपच वाचकप्रिय ठरले.पाच-दहा नाही तर सत्तावीस आवृत्त्या निघाल्या असही त्यांचे कडून समजले.. गुजराथीत,हिंदी अनुवाद झाला...आहे. परवापरवाच संदीप काळेंच "माणुस"की, हे पुस्तक वाचले.संदीप हे सकाळ वृत्तपत्रात एका विभागात संपादकांचे काम बघतात. रविवारी सकाळच्या सप्तरंग पुरवणीत भ्रमंती लाइव्ह. (भ्रमंती LIVE). ह्या सदरांत लेख ते सातत्याने काही महिन्यां पासून लिहित आहेत. संदीप काळेंची अजूनही बरीच पुस्तके आहेत.**


हे लेख म्हणजे सत्यकथाच आहेत. काल्पनिक अस त्यात काही नाही. आपल्या आजूबाजूला जे काही चांगल दिसले,ते त्यांना मांडाव अस वाटले ते माणुसकी मध्ये आपल्या लिखाणातून आपल्या पुढे ठेवल आहे. आपण सगळे नेहमीच म्हणत असतो,की आजूबाजूला खूप वाईट गोष्टी घडत असतात.वाईटच वाईट दिसत.हो ते काही अंशी खरेच आहे. पण आपण त्यातूनच चांगले शोधण्याचा प्रयत्न केला तर खुप काही चांगल्या गोष्टीही घडत असतात. चांगले शोधण्याचा प्रयत्न केला तर नक्कीच चांगले दिसते.आणि नेमका तोच शोध संदीप काळेंनी माणुसकी मधून घेतला आहे.तो अतिशय स्तुत्य आहे.

उत्तम कांबळे यांचे कडून प्रेरणा मिळाली. श्रीराम पवार यांचे पूर्ण सहकार्य मिळाले अभिजित पवारांनी पाठबळ दिल.पाठीवर थाप दिली. आणि सकाळ च्या सप्तरंग पुरवणीत (भ्रमंती LIVE) भ्रमंती लाइव्ह. हे नामकरण होऊन सदर सुरु झाले.

माणुस"की"ह्या संग्रहात सव्वीस कथा आहे.त्यात काहीच काल्पनिक नाही.त्यात सत्यता आहे.त्याला मी सत्यकथांचा लेख संग्रह असच म्हणतो.

वर्धा, अमरावती, पालघर. सोलापूर, सातारा, हिंगोली, लातूर, पुणे, मुंबई, जळगाव, मालेगाव, भिवंडी, कोपरखैराणे, अश्या अनेक ठिकाणी त्याची भ्रमंती झाली, वेगवेगळ्या प्रतिकूल परिस्थितीत काम करणारी, पण सकारात्मक विचारची मंडळी भेटली.त्यांच कार्य संदीप काळेंनी प्रत्यक्ष बघितले.कार्य जाणून घेतले. तेच आपल्या लेखातून लिहून माणुसकीतून मांडले आहे. पहिलीच कथा आहे आतला आवाज. मंजिरी आणि मानसी आगरकर ह्या आईचा व मुलीची. कहाणी आहे. मंजिरी आगरकर आणि मानसी आगरकर या आई आणि मुलीच्या संघर्षाची. लहानपणापासून मानसीला वाचा दोष आणि श्रवणदोष होता. आईची जिद्द होती माझी मुलगी इतर मुली प्रमाणे वावरली पाहिजे, जगली पाहिजे, त्यासाठी मी वाटेल ते करेल आणि हीच भूमिका खंबीरपणे घेऊन उर्मिला आगरकर या उभ्या राहिल्या आणि त्यांना यश मिळालं. मानसी बी.ई. कम्प्युटर सायन्स झाली. इतर शारीरिक परिपूर्ण असलेल्या आणि सर्वगुणसंपन्न असलेल्या मुलींना सुद्धा तिने मागे टाकले. मानसी उत्कृष्ट रांगोळी काढणे त्याच बरोबर टाकाऊ वस्तूपासून वेगवेगळ्या वस्तूंची निर्मिती करते. ऑनलाइन दागिने विकण्याचे काम करते. अशाप्रकारे मानसीची सत्य कहाणी आपल्याला या कथेत वाचायला मिळते. त्याचबरोबर त्यांना वडील आणि भाऊ यांचे पाठबळ होते. आईचा खंबीरपणा आणि सकारात्मक विचार समोर येतो. आजच्या धकाधकीच्या जीवनात स्त्रीने नोकरी करायची म्हटली तरी अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते. त्यात मुख्य म्हणजे मुलांचा सांभाळ कसा करता येईल हा प्रश्न असतो. पुण्याच्या कोथरूड भागात "आनंदघर" इथे छाया गोलटगावकर या फार मोठं काम करत आहेत .आनंदघर बाल संगोपन केंद्र, लर्निंग अँड रिसर्च सेंटरची निर्मिती २०१५ मध्ये झाली. हे नुसते पाळणाघर नाही, तर बाल संगोपन केंद्र आहे कुटुंबासाठी समाजासाठी हे काम आहे. अनेक वेळा आणि ठिकाणी आई पालकांस नोकरी सोडण्याचा मार्ग होता. यावेळी त्यांना विश्वास दिला गेला. फिनलँड ला जाऊन मुलांच्या संगोपनाचा बाल शास्त्राचा बाल मानसशास्त्राचा अभ्यास केला. छाया गोलटगावकर यांच्या सेवाभावी कार्याचा परिचय यातून आपल्याला वाचायला मिळतो. ही एक चळवळ आहे आणि या चळवळीला सगळ्यांच्या मदतीची गरज आहे.हे सांगायला नको."फुलांना समजून घेतांना"ह्यात आपल्याला वाचायला मिळते.

**अन्न हे पूर्णब्रह्म.पुण्यात अनेक ठिकाणी , हॉटेल्स, लग्न समारंभ, पार्टी, यामध्ये खूपसारे अन्न वाया जात असते. पुण्यातील काही तरुण आणि तरुणींनी,




युवकांनी याचे महत्व ओळखले. अन्न गरजूंपर्यंत त्यांचे वस्तीत पोहोचण्याचे काम सुरू केले आहे. जवळपास ६०० ते ७०० युवक याकामी मदत करतात. ज्या ठिकाणी अन्न उरले आहे तेथून फोन केल्यानंतर, आल्यानंतर लगेच ही मंडळी तेथे पोचते . आणि ते अन्न गरजू लोकांपर्यंत पोहोचवले जाऊन त्यांची गरज भागते. युवाशक्तीला विधायक वळण मिळाल्यास किती चांगले काम होते याचं हे उदाहरण आहे.खरंच पुण्यांच काम ते करताहेत. "पुण्याचं काम" या कथेत आपल्याला अशा कार्याचा परिचय होतो. "वंचितांचे हाताना गंध पुस्तकाचा" कथेत भटक्यांच्या मुलांना एकत्र करून त्यांना शिकवण्याचा, शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याच काम महेश निंबाळकर नावाचा तरुण करीत होता. दिवसभर भीक मागणे हीच त्या मुलांची दिनचर्या होती. महेश आणि विनया हे दोहे माढा आणि परांडा येथे प्राथमिक शिक्षक होते परंतु भटक्या आणि विमुक्त मुलांसाठी त्यांना शिकवावे पुस्तकाची ओढ लागावी यादृष्टीने कार्य करण्यासाठी त्यांनी आपल्या नोकरीचा राजीनामा दिला आणि "स्नेहग्राम" ची सुरुवात केली स्नेहग्रामच्या कार्याची ओळख आपल्याला कथेच वाचायला मिळते.

"दीपस्तंभ फाउंडेशन"जळगांव विषयी आपल्याला "पंखाविना भरारी" या कथेत सविस्तर वाचायला मिळते गरीब दिव्यांग अनाथ मुलांसाठी २००५ पासून यजुर्वेंद्र महाजन यांनी "गुरुकुल" "संजीवन" तसेच "मनोबल" या तीन संस्थांची निर्मिती केली. त्यांनी ह्या कार्यात आपले आयुष्य वाहून घेतले आहे. अशा मुलांकडून काहीही न घेता हे कार्य सुरू आहे. ही संस्था म्हणजे आधारवड आहे संस्थेला मदतीची गरज आहे. आणि आपली मदत कुणाचं आयुष्य घडवू शकते ही माणुसकी ची भावना महत्वाची आहे.

त्यांचा संपर्क नंबरही दिला आहे {98 22 47 65 45 } "सरसोती" ही कथा आहे अनुराधा गानू आणि वामन गानू या दोघांच्या कार्याचा परिचय करून देणारी. दोघेही उच्चशिक्षित अनुराधा या अमेरिकेत सी.ए.होत्या. तर वामन यांची कंपनी आहे. आपल्या मातीसाठी काही करावं या उद्देशाने त्यांनी परदेशी स्थायिक भारतीयांकडून बऱ्याच व्यक्ती आणि संस्थांना मदत मिळवून दिली आहे. वाचनही त्यांना आवडत. बहिणाबाई यांच्याविषयी त्यांना काही करावसं वाटतं. त्यादृष्टीने त्यांनी बहिणाबाई च्या कार्याचा परिचय करून देणारी नृत्य नाटिका तसेच नाटक लिहिले. त्याचे भारतात परदेशात प्रयोग झाले. त्यातून आलेला पैसा आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना दिला. लातूर जिल्ह्यातील भुकंपग्रस्त, हरळी गावाला मदत त्या करतात. स्वतः व्हीलचेअरवर बसूनच काम करतात.. मला काही झाले नाही असे त्या म्हणतात. श्यामची आई चित्रपटात जसे गुरुजी उभे राहतात तसेच बहिणाबाई उभ्या राहाव्यात, असा ते विचार करतात. त्याचबरोबर बाबा आमटे यांचेही विचारांचा प्रसार व्हावा असे त्यांना वाटते..

** आई तुझी आठवण येते ही खामगाव जिल्हा बुलढाणा येथील कविता आटोळे यांची कथा. या कथेत आई विषयी उत्कट भाव प्रकट झाला आहे, आणि आईच्या प्रेमात आईच्या निधनानंतर त्यांनी 14 पुस्तकातून याविषयी आठवणी जागवल्या आहेत. त्यांची चौदा पुस्तके प्रकाशित झाली असून अजूनही पंधरा पुस्तके असल्याचे त्यांचे बोललो तेव्हा सांगितले. पुस्तकांची तयारी आहे. आईच्या निधनाला अकरा वर्षे झाली असून त्यांनी आईच्या स्मृतीप्रित्यर्थ काही उपक्रम सुरू ठेवले आहेत.. त्यांची आई पंढरपूरच्या पांडुरंगाची भक्त होती. त्यादृष्टीने त्यांनी दरवर्षी स्त्रियांना पंढरपूरचे पांडुरंगाचे दर्शन घडवण्याचा उपक्रम सुरू ठेवला आहे.. तसेच आईच्या पुण्यतिथीला गरजूंना डोळ्यांच्या शस्त्रक्रिया साठी मदत, स्त्रीभ्रूणहत्या संदर्भात जागृतीचे कार्यक्रम, लेक शिकवा मोहिमांच्या माध्यमातून त्यांनी आईच्या आठवणी जिवंत ठेवल्या आहेत. ह्या आणि अशा जातपंचातीची कर्दनकाळ, मास्तर आणि मास्तरीणबाई,चळवळी ची चाक,हसलेली झेंडूची फुले,उंमेद माणुसकीची.न थकलेला बाबा,नापास मुलांची बाई,अशा व अजुन कथा आहेत.मात्र त्यासाठी माणूस "की" हे पुस्तकच वाचायला हवे.

पुस्तकाला प्रा.डॉं.माया पंडित हैदराबाद,यांची प्रस्तावना आहे.त्या म्हणतात, संदीप काळे यांची भाषा साधी-सोपी,सरळ आणि समतोल आहे. दृष्यात्मक आहे.वर्णन केलेली व्यक्ती, त्याची परिस्थिती आपल्या डोळ्या समोर. उभी रहावी, इतकी प्रत्यक्षदर्शी होते. क्लिष्ट शब्दप्रयोग नाहीत. सर्वसामान्य वाचकाच्या ह्रदयाला थेटपणे भिडते.

"ज्यांच ज्यांच काम जबरदस्त होत,ते लोकांपर्यंत पोहचाव,काम करणाऱ्यांना समाजमान्यता मिळावी, हा उद्देश सफल झाला आहे.त्यांना आर्थिक मदतही मिळाली आहे." आपल्या मन की बात मध्ये त्यांनी समाधान व्यक्त केल आहे. आपल्या पाठराखण मध्ये, प्रा.डॉं.मथु सामंत यांनी महत्वाची गोष्ट सांगितली आहे,ती प्रसारमाध्यमांचे भुमिके विषयी .आणि आपला टीआरपी वाढवणे संबंधी. त्यांच्या नकारात्मक पार्श्वभूमीवर काळे यांची सकारात्मक भुमिका फार वेगळी आहे.लेखनातून चळवळीला आधार दिल्याचे हे अनोखे उदाहरण आहे. असामान्य काम करणारा सामान्य माणुस, हा लेखनाचा मध्यवर्ती विषय आहे. पुस्तकाचे मुखपृष्ठ ,मांडणी चांगली आहे. अर्पण पत्रिका संदीप यांचे मनातील भाव व्यक्त होतात.

थोडक्यात मी म्हणतो-माणुस"की" ह्या सामान्य माणसाच्या असामान्य कार्याच्या मनाला स्पर्श करणाऱ्या सत्यकथा आहेत. त्या साठी हे पुस्तक वाचावयास हवे. एक चांगले पुस्तक वाचल्याचे नक्कीच समाधान मिळेल.तूर्त एवढेच.

माणूस"की"
संदीप रामराव काळे.
सकाळ प्रकाशन. पुणे.
मुख्य.२४०/-

# भारतीय संघाने इतकी नामुष्की का पत्करावी?



रमेश लांजेवार, नागपूर
संपर्क क्र. 9921690779

आधुनिक केसरी

**विश्वचषक टी -20 मध्ये लामीला पाकिस्तानला नमवून दिमाखदार सुरुवात करणाऱ्या भारतीय संघाला टी-20 विश्वचषक स्पर्धेत इंग्लंडविरूध्द अत्यंत निराशाजनक पराभवासह स्पर्धेबाहेर पडावे लागले.भारतीय फलंदाजांनी समाधानकारक स्थितीमध्ये स्कोअर नेल्यानंतर भारतीय गोलंदाज इंग्लंडसमोर लोटांगण गेल्याचे स्पष्ट दिसुन आले व एकही विकेट न घेता इंग्लंडचा विजयाचा मार्ग मोकळा केला.**

क्रिकेट हा 11 खेळाडूंचा खेळ आहे.त्यामुळे प्रत्येक खेळाडूनी आपले कर्तव्य पार पाडने गरजेचे असते.परंतु भारताच्या ढासळत्या गोलंदाजीने संपूर्ण क्रिकेट जगतात भारतीय क्रिकेट संघाची नामुष्की दिसून आली.क्रिकेट जगतामध्ये जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानी असलेल्या भारतासाठी अंतिम फेरीचा मार्ग सोपा मानला जात होता." किंतु,परंतु" या शब्दाने घात केला आणि भारतीय संघाच्या नशीबी नामुष्कीजनक हार पदरात पडली हे भारतीय क्रिकेट संघाचे दुर्दैवच म्हणावे लागेल. जगात भारतीय क्रिकेट बोर्ड आर्थिकदृष्टया सर्वात जास्त श्रीमंत आहे.परंतु खेळांमध्ये नामुष्की किंवा लाचारी का? भारतीय क्रिकेट बोर्ड श्रीमंत असल्याने भारतात दरवर्षी आयपीएल सामन्याचे आयोजन करण्यात येते व यात विदेशातील अनेक नामवंत खेळाडूं भाग घेतात.यातुनच सिलेक्शन कमेटी चांगले खेळाडू निवडत असतात व आंतरराष्ट्रीय सामन्यासाठी टीम तयार करण्यात येते.म्हणजे इतर देशांच्या तुलनेत भारतीय क्रिकेट संघातील खेळाडूंचा सामना इतर देशांच्या नामवंत खेळाडूंशी होतो तरीही खेळांमध्ये परिपक्वता दिसत नाही याचे दुःख होते. परंतु विदेशी खेळाडू पुर्णपणे परीपक्व होतांना दिसत आहे हे स्पष्ट दिसुन येते.एखादा खेळाडू चांगला खेळला की मिडिया त्याला डोक्यावर नाचवीते. नंतर त्या खेळाडूचे खेळ फ्लॉप होतात त्यांचे दुःख क्रिकेट प्रेमीना सहन करावे लागते.आशिया चषक टी-20 असो वा विश्वचषक टी-20 असो संपूर्ण टीमचे टीमवर्क असायला पाहिजे होते. तेव्हाच त्याला योग्य खेळ म्हणता येईल अन्यथा नाही.कोणताही खेळ असो सर्वांनीच आप आपली जबाबदारी जातीने स्वीकारली असती तर भारतीय क्रिकेट टीम आशिया चषकच्या बाहेर गेला नसता किंवा विश्वचषकात नामुष्की पत्करावी लागली नसती.कारण यावर्षीचा आशिया चषका सारखा घाणेरडा खेळ आणि विश्वचषक टी-20 सारखा नामुष्कीजनक खेळ कधीच झाला नाही.आज क्रिकेट जगतात सर्वांनाच ठाऊक आहे की भारतीय क्रिकेट टीम परीपक्व आहे.तरीही नामुष्की ठरणारी हार ही 130 कोटी जनतेच्या जिव्हारी लागली व काळजात घाव करून गेली.हीबाब क्रिकेट बोर्ड, क्रिकेट टीम व क्रिकेटचे संबंधित अधिकारीवर्ग यांनी लक्षात ठेवली पाहिजे व त्यापध्दतीने पुढील पाऊल उचलायला हवे.पाकिस्तान विश्वचषकाच्या बाहेर जाणारी टीम अंतिम फेरीत आली आणि अंतिम फेरीत जाणारा भारत विश्वचषका बाहेर नामुष्कीने निघाला यांचे दुःख भारतीयांना आहे.भारताचा अंतिम सामन्याचा घास अचानक इंग्लंडच्या घशात गेला.भारतीय टीममध्ये कधी बॅटिंग लाईन चांगली असते तर कधी बॉलींगलाईन वाईट असते.यामुळे संपूर्ण टीमचा तालमेल बिघडतो व पराजयाचा सामना करावा लागतो हे भारतीय क्रिकेट संघाचे दुर्भाग्य म्हणावे लागेल.आशिया चषकमध्ये भारतीय क्रिकेट संघाची सुपर -4 मधील कामगिरी अत्यंत लाजीळवानी रहाली व घरवापसी यावे लागले आणि आता विश्वचषक टी-20 मध्ये दारून पराभव पत्करावा लागला. त्यांचे काय?टीम इंडिया नेहमीच आशिया चषक स्पर्धेत विजेतेपदाच्या फेरीमध्ये रहायचा.परंतु सुपर-4 मधील ढासळती कामगिरी पहाता संपूर्ण क्रिकेट प्रेमींची तळपायाची आग मस्तकात गेली व आता विश्वचषकातील पराजय याचे दुःख यावर भारतीय क्रिकेट बोर्डने गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. भारतीय टीम हारण्याचे मुख्य कारण म्हणजे ढासळती गोलंदाजी व एकाग्रतेचा अभावच म्हणावा लागेल.त्यामुळे खेळताना कोणाचे कीती शकत झाले ते महत्त्वाचे नसून संपूर्ण टीमने जिंकण्यासाठी काय करावे ते महत्त्वाचे असते त्याला खरी टीम म्हटल्या जाते.याकरीता बॅटिंग,बॉलींग व फिल्डींग ही समसमान असायला पाहिजे तेव्हाच टीमची पकड मजबूत होत असते व प्रतिस्पर्धी टीमला टक्कर देण्यासाठी सक्षम रहाते अन्यथा नाही.कोणताही खेळ असो हार किंवा जीत अटळ असतेच.परंतु खेळ हा चीकाटीचा,जीद्दीचा आणि मुत्सद्देगिरीचा असावा जेणेकरून पुढची टीम भयभीत व्हायला हवी. परंतु आशिया चषकमध्ये व विश्वचषकात टीम इंडियाचा खेळ फ्लॉप ठरला. जनुकाय इंग्लंड टीम समोर भारतीय क्रिकेट टीमने लोटांगण गेले की काय असे वाटत होते.आपण सर्वांसोबत खेळलो त्याचप्रमाणे इंग्लंड सोबत खेळलो असतो तर भारतीय क्रिकेट टीमला नामुष्की टाळता आली असती व विश्वचषक टी-20 मध्ये भारताचा प्रभाग कायम रहाला असता.यानंतर अशी वेळ येणार नाही याची काळजी टीम इंडियाने, भारतीय क्रिकेट बोर्डने घेतली पाहिजे.

# संत मुक्ताबाई

शिवलिंग महाराज बैलकवाड

मुंगी उडाली आकाशीं | तिणें गिळीलें सूर्याशीं |

महाराष्ट्रात अनेक संत महात्म्ये होऊन गेले. या संतांबरोबरच अनेक स्त्री संत समाविष्ट आहेत ज्यांनी समाजकार्यात बहुमूल्य वाटा उचलला आहे. ज्यांनी मायमराठी च्या सारस्वतात भक्तीचा मळा फुलवला आणि मराठी साहित्याचे दालन भावसंपन्न केले, ज्यांना असामान्य बुद्धिमता लाभली, ज्या अलौकिक भावंडांच्या वलयात वाढल्या, भक्तियोग मार्ग यात पारंगत असलेल्या ज्ञानेश्वरांची बहिण म्हणजेच संत मुक्ताबाई. संत मुक्ताबाई यांचा जन्म महाराष्ट्रातील आपेगाव येथे ई.स. १२७९ साली झाला. या महाराष्ट्रातील संत कवयित्री होत्या. संत मुक्ताबाई "मुक्ताई" या नावाने ओळखल्या जातात. रुक्मिणीबाई व विठ्ठलपंत हे त्यांचे आई वडील. संत निवृतीनाथ, संत ज्ञानेश्वर व संत सोपानदेव हे मुक्ताबाईंचे थोरले भाऊ होते. खरे तर विरक्ती, ज्ञान, भक्ती आणि मुक्ती यांचे मूर्तिमंत स्वरूप घेऊन निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान, मुक्ता जन्माला आली. साक्षात दिव्यत्वाची ही चार रूपे रुक्मिणी आणि विठ्ठलपंतांचे मातृ-पितृत्व धन्य करणारी ! पण हे दिव्यत्व जगाला समर्पित करून मत पित्याला जगाचा निरोप घ्यावा लागला. पोरवयातच निवृत्तीनाथ आणि त्यांच्या भावंडाना संन्याशाची पोर म्हणून वाळीत टाकून त्यांची विटंबना केली, पण हे सारे भोग सोसत ह्या चारही बहिण भावंडानी ब्राम्हविध्येची अखंड उपासना केली. आपल्यानंतर आपली मुल सुखी रहावीत या आशेने विठ्ठलपंत आणि रुक्मिणीबाई यांनी निर्दय समाजाने दिलेल्या देहांत प्रायःश्चिताचा निर्णय मान्य करून देहत्याग केला. मातापित्याच्या या देहत्यागानंतर या अनन्य साधारण कुटुंबाच्या गृहीणीपदाची नाजूक जबाबदारी मुक्ताबाईंवर



पडली. ती तितक्याच समर्थपणे तिने उचलली आणि पेलली. आपल्या भावंडांची जणू ती माउलीच झाली. त्यामुळे खेळण्या-बागडण्याच्या वयातच मुक्ताई प्रौढ, गंभीर, सोशिक समंजस बनली. मुक्ताबाईच्या हातून ही विश्व उद्धाराचे कार्य घडले. योगी चांगदेव एवढा मोठा तपस्वी होता. पण त्याने गुरु केला नसल्याने त्याला ईश्वरदर्शन झाले नव्हते. मुक्ताबाईंनी योगी चांगदेवाना 'पासष्टी' चा अर्थ उलगडून दाखविला. मुक्ताबाईच्या अनुग्रहाने चांगदेवाना आत्मरुपाची प्राप्ती झाली, तेव्हा त्यांचे १४०० वर्षाचे आयुष्य धन्य झाले. "आठ वर्षाची मुक्ताई १४०० वर्षाच्या चांगदेवांची अध्यात्मिक गुरु बनली." कृतार्थतेने चांगदेव म्हणतात, "मुक्ताई करे लेइले अंजन". ज्ञानेश्वरांनी एकदा मुक्ताबाईला मांडे बनवण्यास सांगितले. त्याकरता मुक्ताबाई मातीचे खापर आणण्यासाठी कुंभारवाड्यात गेली. विसोबा चाटी हा त्या गावाचा प्रमुख होता जो या चार भावंडांचा द्वेष करत असे. त्याने मुक्ताबाईला कोणीही खापर देऊ नये अशी गावात ताकीद केली. **क्रमशः**

# राहुलजींवर विश्वास असल्यानेच पदयात्रेला मोठा प्रतिसाद

## कन्हैया कुमार : देशात प्रचंड बेरोजगारी असताना केवळ अमित शाह यांच्या मुलालाच नोकरी



आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** विविधतेत एकता ही या देशाची ओळख असताना ही ओळख पुसण्याचे काम मागील काही वर्षांपासून केले जात आहे. द्वेषाचे बिज पेरून समाजा-समाजाला, जाती-धर्माला एकमेकांविरोधात लढवून भाजपा आपली राजकीय पोळी भाजत आहे. देशात महागाई, बेरोजगारीची समस्या मोठी असताना केंद्रातील भाजपा सरकार त्याकडे लक्ष देत नाही. जनतेला त्यांनी वाऱ्यावर सोडून दिले आहे. अशा विपरीत परिस्थितीत भारत जोडो यात्रेच्या माध्यमातून देश जोडण्यास निघालेल्या राहुलजी गांधी यांच्याकडून लोकांच्या आशा, अपेक्षा व विश्वास असल्याने प्रचंड मोठ्या संख्येने लोक सहभागी होत आहेत, असे काँग्रेस नेते कन्हैयाकुमार यांनी सांगितले.

नांदेड जिल्ह्यातील अर्धापूर येथे पत्रकारांशी संवाद साधताना कन्हैयाकुमार यांनी भारत जोडो यात्रेचा उद्देश स्पष्ट केला व देशातील सद्य परिस्थितीवर भाष्य केले. ते पुढे म्हणाले की, पदयात्रेत सहभागी झालेले लोक त्यांना भेडसावणाऱ्या दैनंदिन जिवनातील समस्यांवर बोलत आहेत. शेतकऱ्यांच्या ऊसाला भाव मिळत नाही, शेतमालाला भाव मिळत नाही, उच्च शिक्षण घेऊनही नोकरी लागत नाही अशी तरुणांची अवस्था आहे मात्र अमित शाह यांच्या मुलाला मात्र नोकरी लागते तेही नियम बदलून याचा संताप तरुणांमध्ये आहे. आपली स्वप्नं भाजपा सरकार धुळीस मिळवत आहे हे त्यांचे दुःख आहे. महागाईने महिलांचे स्वयंपाकघराचे बजेट कोलमडले आहे. जिवघेण्या महागाईत जगणे मुश्कील झाले आहे. जनतेच्या या समस्या असताना केंद्रातील भाजपा सरकार मात्र या मुळ मुद्द्यांना हात घालत नाही. जनतेचे लक्ष दुसरीकडे वळवण्यासाठी ते इतर मुद्द्यांना महत्व देत आहेत. सरकार जनतेचे ऐकत नाही पण राहुलजी गांधी मात्र जनतेच्या समस्या, वेदना, दुःख ऐकून घेत आहेत. आपले दुःख ऐकण्यासाठी आपल्याकडे कोणीतरी आले आहे ही भावनाच जनतेला आपलीशी वाटत आहे.भारत जोडो यात्रेचा उद्देश पवित्र व स्वच्छ असून देश तोडणाऱ्या शक्तींना देश जोडण्यातून उत्तर दिले जात आहे आणि याकामी जनतेचे मोठे समर्थन लाभत आहे.

या पदयात्रेचा उद्देश केवळ निवडणुका जिंकणे नाही तर जनतेला विश्वास देण्याचा आहे, देशातील एकोपा कायम ठेवणे आहे. आपापसात भांडण्यापेक्षा महागाई, बेरोजगारीसह आपल्याला भेडसावणाऱ्या समस्या सोडवण्याची लढाई लढली पाहिजे हे जनतेला आता समजले आहे, असेही कन्हैयाकुमार म्हणाले. या पत्रकार परिषदेला महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे उपस्थित होते.

## 'आईचा हात'ला मिळाला राज्यस्तरीय बालसाहित्य पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** कोल्हापूर येथील मराठी बालकुमार साहित्य सभा यांच्यावतीने २०१९-२० चा राज्यस्तरीय उत्कृष्ठ बालसाहित्य निर्मितीचा पुरस्कार मराठवाडयाचे प्रसिध्द बाल कवी अय्युब पठाण लोहगावकर ऊर्फ अ. म. पठाण यांचा अतिशय दर्जेदार व आशयघन बाल कवितासंग्रह, " आईचा हात " ला जाहीर झाला आहे. या आशयाचे पत्र नुकतेच संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. श्रीकांत पाटील यांनी अय्युब पठाण यांना दिले आहे. स्मृतीचिन्ह, सन्मानपत्र, आणि रोख रक्कम असे पुरस्काराचे स्वरूप असून लवकरच कोल्हापूर येथे मान्यवरांच्या हस्ते कवी अय्युब पठाण लोहगांवकर यांना सन्मानित करण्यात येणार आहे.




## महापालिकेच्या नाट्यगृहाप्रमाणे शासनाच्या रवींद्र नाट्यमंदिरचे भाडेही पाच हजार करावे

आधुनिक केसरी न्यूज

**सचिन उन्हाळेकर**

**मुंबई :** मुंबई महानगरपालिकेच्या नाट्यगृहाप्रमाणे राज्य शासनाने रवींद्र नाट्य मंदिरचे भाडे शुल्क ही ५ हजार रुपये करावे, अशी मागणी करुनही अद्याप यावर कोणताही पाऊल सरकार तर्फे उचलण्यात न आल्याने नाट्य निर्माता - व्यवस्थापकांमध्ये नाराजीचे पसरली आहे. एकीकडे कोरोनामुळे आर्थिक संकटात सापडलेल्या नाट्य व्यवसायाला मुंबई महापालिकेने मदतीचा हात दिला असताना राज्य शासन आपला हात आखडता का घेत आहे, असा सवाल उपस्थित झाला आहे. मुंबई महापालिकेच्या नाट्यगृहात सध्या मराठी नाटक आणि वाद्यवृंदासाठी प्रति खेळ १९, ८५० रुपये अधिक जीएसटी आहे. तर अमराठी प्रति खेळ ३९, ६९० रुपये अधिक जीएसटी असे दर आहेत. त्यात कपात करुन मराठी नाटक आणि वाद्यवृंदासाठी प्रति खेळ पाच हजार रुपये भाडे आकारले जाणार आहे. तर अमराठी नाटक आणि वाद्यवृंदासाठी प्रति खेळ १० हजार रुपये भाडे आकारण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. अशा पद्धतीने ७५ टक्के प्रमाणे देण्यात आलेली सवलत ३१ मार्च पर्यंत कायम ठेवण्यात येणार आहे.

ही भाडे सवलत विलेपार्ले येथील मास्टर दीनानाथ मंगेशकर नाट्यगृह, बोरिवली येथील प्रबोधनकार ठाकरे नाट्यगृह आणि मुलुंड येथील महाकवी कालिदास नाट्यमंदिर येथे असणार आहे. अशा प्रकारे कोरोना आणि त्यापाठोपाठ आलेल्या ओमायक्रोन संसर्गाचा विविध नाटक व्यवसायांना जो आर्थिक फटका बसला त्यात एक मदतीचा हात महापालिकेने दिला आहे.

मात्र याचवेळी राज्य शासनाच्या रवींद्र नाट्य मंदिर मध्ये मराठी नाटक आणि वाद्यवृंदाच्या प्रति खेळासाठी कोणत्याही प्रकारची सवलत देण्यात आलेली नाही. येथील शनिवार आणि रविवारी नाटकाचे प्रति खेळ दर हे १५ हजार रुपये आहेत. तर अमराठी वाद्यवृंदासाठी प्रति खेळ भाडे हे सुमारे ३५ हजार रुपये आहे.




मुंबई महापालिकेच्या नाट्यगृहाप्रमाणे शासनाच्या रवींद्र नाट्यगृहाचे भाडे शुल्क ही ५ रुपये आकारण्यात यावे, अशी मागणी नाट्य निर्माता - व्यवस्थापकांनी केली आहे.

मुंबई महापालिकेने जसे ५ हजार रुपये भाडे शुल्क ३१ मार्च २०२३ पर्यन्त आकारण्याचा स्वागतार्ह निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी करून नाट्य क्षेत्राला एक आधार देण्याचे कार्य केले आहे. त्याप्रमाणे रवींद्र नाट्य मंदिराचे भाडे ही ५ हजार रुपये आकारून नाट्यक्षेत्राला एक मदतीचा हात द्यावा, अशी प्रतिक्रिया नाट्य व्यवस्थापक हरिभाऊ पाटणकर सोबत नितीन नाईक यांनी व्यक्त केली आहे. नाट्य निर्माता संतोष शिदम यांनी ही याबाबत अशीच प्रतिक्रिया व्यक्त करताना म्हणाले की, रवींद्र नाट्य मंदिर हे शासनाच्या अखत्यारीत येते. शासनाने ही मराठी नाटकाला मदतीचा हात देण्यासाठी मुंबई महापालिकेने जसे भाडे शुक्ल दरात सवलत दिलेली आहे, तशीच सवलत दिली तर नाट्य व्यवसायाला आधार मिळेल. अलिकडेच रवींद्र नाट्य मंदिर मध्ये मराठी नाटकांचे प्रयोग होऊ लागले आहेत. अशावेळी रवींद्र नाट्य मंदिर मध्ये मराठी नाटकांचे अधिकाधिक प्रयोग होण्यासाठी सवलत देणे आवश्यक असल्याची प्रतिक्रिया ही काहींनी व्यक्त केली. दरम्यान, या संदर्भात नाट्य निर्माता आणि व्यवस्थापक संघाकडून रवींद्र नाट्य मंदिरचे भाडे शुल्क महापालिकेच्या नाट्यगृहाप्रमाणे ५ हजार रुपये करण्यात यावे, अशा प्रकारचे मागणी पत्र शासनाच्या सांस्कृतिक विभागाला देण्यात आले आहे, मात्र अद्याप शासनाकडून अद्याप कोणतेही पाऊल उचलण्यात आलेले नाही.

## सहा लाखांचे कच्चे तेल चोरीस

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शहरातील अवधान औद्योगिक वसाहतीतील डिसान ॲग्रो टेक कंपनीत सुपरवायझरने हेराफेरी करीत सव्वा सहा लाखांच्या सोयाबीनच्या कच्च्या तेलाची  चोरी केली. दि. 7 नोव्हेंबर रोजी चार वाजेच्या सुमारास हा प्रकार घटला. याप्रकरणी सुपरवायझरसह सहा जणांविरोधात गुन्हा नोंद झाला आहे. याबाबत कंपनीचे मॅनेजर अशोक मुकुंदा सोनार (रा. प्लॉट नं. 10 रा. महालक्ष्मी कॉलनी, शिरपूर) यांनी मोहाडी पोलिसात फिर्याद दिली आहे. त्यानुसार डिसान कंपनीत तेल विभागात यापूर्वी वजन काटा ऑपरेटर व सध्या डी.ओ.सी.विभागात सुपरवायझर पदावर कार्यरत असलेला कर्मचारी प्रमोद दिलीप सोनवणे (रा. सौंदाणे ता.धुळे) यांच्या सांगण्यावरुन व मार्गदर्शनानुसार अक्षय हिंमत नगराळे (रा. संबोधी नगर, सुरत बायपास रोड, धुळे), गिरीष रविंद्र पाटील (रा. सोन्या मारोती कॉलनी, मिल परिसर, धुळे), सुमित हनुमंत मोरे (रा. स्वामी नारायण कॉलनी, साक्री रोड, धुळे) यांनी टँकर चालकांशी संगनमत केले.

कंपनीच्या प्लांटमधून व्यापाऱ्यांच्या ऑर्डर व्यतिरिक्त 6 लाख 34 हजार 920 रुपये किंमतीचे 4 हजार 70 किलो ग्रॅम अधिकचे तेल प्लांटमधून चोरी केले. ते टँकर चालक ललित जगन्नाथ भरोदीया (रा. जवाहर टेकडी, धार रोड, इंदौर) व अभिताभ सुकदेव पाटील (रा. जयशंकर कॉलनी, मोहाडी) यांना चोरी करुन टँकरमध्ये भरुन दिले. म्हणून वरील सहा जणांवर भादंवि कलम 381, 34 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास मोहाडी पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक भुषण कोते हे करीत आहेत.

## मंडळ अधिकाऱ्यावर हल्ला

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** वाळूमाफियांनी केलेल्या जीवघेण्या हल्ल्यात येथील मंडळ अधिकारी गंभीर जखमी झाले असून यात सर्कल कार्यालयाची देखील तोडफोड करण्यात आली आहे. धुळ्यातील खाजगी रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरू आहे. या प्रकरणात मंडळ अधिकाऱ्याच्या फिर्यादीवरून शिंदखेडा पोलीस स्टेशनमध्ये दुपारी उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू होते. सूर्यकांत श्रीराम मोरे असे हल्ला झालेल्या मंडळाधिकाऱ्याचे नाव असून त्यांची प्रकृती बरी नसल्याने मध्यरात्रीपर्यंत मंडळ अधिकारी कार्यालयात बसून होते. त्याच दरम्यान वाळू माफियांनी हल्ला केला असल्याचा आरोप जखमीच्या नातेवाईकांनी केला आहे. या प्रकरणातील आरोपींचे 24 तासाच्या आत मुस्क्या न आवळल्यास



तहसीलदार संघटना रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याचा इशारा प्रशासनाला दिला आहे.

## ट्रॅव्हलच्या चाकाखाली तरुण चिरडला

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** गुजरात येथील साईनाथ ट्रॅव्हल्स चालकाचा हलगर्जी आणि निष्काळजीपणा तरूणाच्या जिवावर बेतला आहे. बसमध्ये चढत असतांनाच चालकाने अचानक बस सुरू केल्याने खाली पडून चाकाच्या खाली येवून तरूण ठार झाला. याप्रकरणी चार दिवसानंतर चालकावर गुन्हा दाखल झाला आहे. किरण रामा गवळी (वय 25 रा. दहिवद जि. नंदुरबार) असे मयत तरूणाचे नाव आहे. तो दि.3 रोजी दुपारी बारा ते साडेबारा वाजेदरम्यान गावी जाण्यासाठी चोपडाकडून सुरतकडे जाणाऱ्या साईनाथ ट्रॅव्हल्समध्ये (क्र.जीजे 14 झेड 6636) चढला. पंरतू चालकाने प्रवासी बसमध्ये पुर्णपणे चढल्याची खात्री न करता बसला गती दिली.



त्यामुळे बसमध्ये चढत असतांना किरण हा दोंडाईचा-नंदुरबार रस्त्यावरील वीज कंपनीच्या सबस्टेशनजवळील हॉटेल आशिष परमिटरूम बिअरबारच्या बोर्डाजवळ बसमधून रस्त्यावर खाली पडून गाडीच्या मागील चाकाखाली आल्याने गंभीर जखमी झाला. उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. त्याच्या मृत्यूस बस चालक कारणीभूत असल्याने चालकावर दोंडाईचा पोलिसात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. तपास पोहकाँ निंबाळे करीत आहेत.



# सर्व सेवा एका छताखाली देण्यासाठी 'वन सेवा केंद्र'

## वनमंत्री सुधीर मुनगंटीवार

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** सामान्य नागरिकांना आपले सरकारच्या माध्यमातून अनेक सेवा सुविधा उपलब्ध होत असतात. याच धर्तीवर वन विभागामार्फत केंद्राच्या, राज्य शासनाच्या सेवा देण्यासाठी "वन सेवा केंद्र" सुरू करून यामार्फत वन विभागाच्या सर्व सेवा एका छताखाली देण्यात याव्यात, असे वने मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी निर्देश दिले. वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या अध्यक्षतेखाली आज राज्यातील व्याघ्र संवर्धन प्रतिष्ठान नियामक मंडळाची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला राज्य उत्पादन शुल्क मंत्री शंभूराजे देसाई, आमदार सर्वश्री आशीष जयस्वाल, राजकुमार पटेल, मनोहर चंद्रिकापुरे, विजय राहागडाले, प्रकाश भारसाखळे यांच्यासह वने विभागाचे प्रधान सचिव वेणूगोपाल रेड्डी, प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) वाय.एल.पी.राव, प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) महीप गुप्ता, अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) बी.एस.हुडा,उप वनसंरक्षक तथा क्षेत्रसंचालक नवेगांव नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्राचे जयरामे गौडा आर, गोंदियाचे अतिरिक्त जिल्हाधिकारी राजेश खवले यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते. मुनगंटीवार म्हणाले की,राज्यात सध्या ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प, नवेगाव -नागझिरा व्याघ्र प्रकल्प, पेंच -बोर व्याघ्र प्रकल्प मेळघाट आणि सह्याद्री व्याघ्र प्रकल्प आहेत. राज्यातील व्याघ्र प्रकल्प क्षेत्राकरिता व्याघ्र संवर्धन प्रतिष्ठानची स्थापना करण्यात आली आहे. सर्व व्याघ्र प्रकल्प प्लास्टिकमुक्त असतील आणि संपूर्ण स्वच्छतेला प्राधान्य देणारे असावेत.

येणाऱ्या काळात या प्रतिष्ठानमार्फत राज्यातील व्याघ्र प्रकल्प सर्वदूर पोहोचवण्यासाठी तसेच येथे पर्यटकांची संख्या वाढीसाठी प्रयत्न करण्यात येणे आवश्यक आहे.पर्यटकांची संख्या चांगल्या चांगल्या सोयी सुविधा निर्माण केल्या तरच वाढणार असल्याने यासाठी बीओटी किंवा पीपीटी मॉडेल कसा विकास करता येईल का याचा अभ्यास करण्यात यावा. याशिवाय सर्वच व्याघ्र प्रकल्प ठिकाणी देण्यात येणाऱ्या सुविधांचे गुणांकन करण्यात यावे. याशिवाय पर्यटनासाठी येणाऱ्या पर्यटकांच्या सोयीने एका वर्षाचे वेळापत्रक तयार करण्यात यावे असेही वने मंत्री यांनी सांगितले.



प्रत्येक व्याघ्र प्रकल्प प्रतिष्ठानने आपले स्वतःचे संकेतस्थळ बनवून त्यावर संबंधित व्याघ्र प्रकल्पाचे इत्यंभूत माहिती द्यावी. व्याघ्र प्रकल्पाचे फोटो, इतर माहिती या बरोबरच येथे असलेल्या पर्याप्त सुविधा यांची माहिती द्यावी. तसेच व्याघ्र प्रकल्प अधिकाधिक लोकप्रिय होण्यासाठी वेगवेगळ्या स्पर्धा जसे निबंध स्पर्धा, बोलक्या भाषेतील व्हिडिओ, अशा काही वेगळ्या स्पर्धा घेण्यात याव्यात असे मुनगंटीवार यांनी सांगितले. वनेमंत्री म्हणाले की, संबंधित व्याघ्र प्रकल्प येथे राहणाऱ्या स्थानिकांना रोजगार हा केंद्रबिंदू मानून लोकसंख्या निहाय अभ्यास करणे, येथील नागरिकांन रोजगार आणि स्वयंरोजगार वर्षभर नियमितपणे कसा मिळू शकेल यासाठी एक अभ्यास समिती नेमली जावी. तसेच या समितीत स्थानिक खासदार आणि आमदार यांची समिती तयार करण्यात यावी. येत्या काळात वन विभागाने शामाप्रसाद मुखर्जी योजनेचे मूल्यमापन करून याचा फायदा होत आहे का याबाबत एक अहवाल द्यावा. कृषी पीक पद्धती वनपूरक करता येईल का याचा अभ्यास होणे आवश्यक असून यासाठी डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ यांची मदत घ्यावी. काही वर्षांपूर्वी गिधाड आणि चिमणी यांच्या प्रजाती कमी होत असल्याचे दिसून आले होते. यानंतर वन विभागाने प्रयत्न करून ही संख्या वाढण्यासाठी प्रयत्न केले होते.आता सारस पक्षी वाढवण्यासाठी काय करता येईल यासाठी बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीचे मदत घेण्यात यावी. वन विभागाच्या मानका पेक्षा वेगळ्या पद्धतीने दुभाजक केल्यामुळे राष्ट्रीय महामार्गावरील वन्यप्राण्यांचा अपघात होणे होऊन मृत्यू होत आहेत. हे थांबवण्यासाठी तातडीने नागपूरच्या भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांना पत्र लिहून याबाबत तातडीने कार्यवाही करण्यात यावे.

व्याघ्र प्रकल्प क्षेत्राचे व्यवस्थापन तसेच व्याघ्र प्रकल्प क्षेत्रात वाघ या प्राण्यासहीतसंपूर्ण जैवविविधतेचे संवर्धन करणे व स्थानिक लोकांचे सहभागाने परिस्थितीकी विकास कामांना गती देण्यावर भर देणे आवश्यक आहे. याबरोबरच व्याघ्र प्रकल्प क्षेत्र व परिसरातील परिस्थितीकीय, आर्थिक, सामाजिक व सांस्कृतीक विकासाला गती देणे, स्थानिक लोकांचे सहभागाने निसर्ग पर्यटनास चालना देणे, व्याघ्र प्रकल्प क्षेत्रातसंशोधन, पर्यावरण शिक्षण व प्रशिक्षण इत्यादीसाठी प्रयत्न करणे गरजेचे असून यादृष्टीने सर्वकष आराखडा तयार करण्यात यावा असेही मुनगंटीवार यांनी सांगितले.

# पैठण तालुक्यात ड्रॅगन फ्रूट व फळ पिकांविषयी चर्चासत्राचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज



**पैठण :** तालुक्यातील ड्रॅगनफ्रुट, मोसंबी, सिताफळ उत्पादकाच्या फळपिके जतन करण्यासाठी विशेष तांत्रिक चर्चासत्राचे आयोजन साई कृषी सेवा केंद्र व PAC बायोफंगबॅक्ट यांच्या वतीने आयोजित करण्यात आल्याची माहिती उमेश तट्टु, साई कृषी यांनी दिली आहे. तालुक्यातील मोसंबी अंबेबहार,उन्हाळी कांदा, सिताफळ बहार, ड्रॅगनफ्रुट बहार याविषयी चर्चासत्रचे दि.१३ रविवारी रोजी रविवारी सकाळी अकरा वा. पैठण तालुक्यातील नायगाव रोडवरील नंदलाल काळे यांच्या शेतात चर्चासत्र कार्यक्रम आयोजित करण्यात येणार असून या चर्चासत्रात प्रमुख पाव्हुणे सोमनाथ सुर्यवंशी (पीएसी. बायोफंगबॅक्ट, पुणे) मार्गदर्शक देवेंद्रभाई पटेल( सि.एम.डी.पी. एस.बायोफंगबॅक्ट) कार्यक्रमाचे अध्यक्ष नंदलाल काळे( अध्यक्ष केशर अंबा उत्पादक संघ महा.राज्य) तसेच साई कृषीचे संचालक भगवानराव तट्टु यांची उपस्थिती राहणार असुन मोसंबी सह फळ पिक उत्पादक शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन साई कृषीच्या वतीने करण्यात आले आहे.



# छोट्या सर्वेशचे स्वप्न राहुल गांधींनी साकारले

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** भारत जोडो यात्रेदरम्यान नांदेडच्या वाटेवर असताना राहुल गांधी यांना दोन मुलांनी सॉफ्टवेयर इंजीनियर व्हायचे बोलून दाखवले पण आपण आजपर्यंत संगणक पाहिला व आपल्या शाळेतही नसल्याचे सांगितले. शाळेत संगणकच नाही तर या मुलाचे स्वप्न कसे पूर्ण होणार हे जाणून राहुल गांधींच्या उपस्थितीत काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी या मुलाला संगणक भेट दिला. आता या मुलाच्या स्वप्नाला बळ मिळाले.

पण ही एका मुलाची गोष्ट झाली, हिंदुस्थानमधील प्रत्येक मुलाचे स्वप्न साकार करण्याचा आमचा प्रयत्न आहे. देशातल्या प्रत्येक मुलाने माजी पंतप्रधान राजीव गांधी यांचे आधुनिक तंत्रज्ञानाचे स्वप्न पूर्ण करावे. परंतु भाजपा सरकारच्या नाकर्तेपणामुळे लाखो मुले कोरोना काळात संगणक नसल्याने ऑनलाईन शिक्षणापासून वंचित राहिले. भारत जोडो यात्रा अशा स्वप्नांना मुर्त रुप देण्याचे काम करत आहे.




# प्राण्यांना दत्तक घेण्यासाठी 'पेटगाला पेट शो, पुणे' ठरणार प्राणीप्रेमींमधील दुवा

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** सर्व सृष्टीवर प्रेम करा' हे भारतीय संस्कृतीमध्ये अनेक प्रकारे सांगितले आहे. जगात अनेक ठिकाणी प्राणिमात्रांना क्रूरपणे वागवले जाते किंवा त्यांच्याकडे दुर्लक्षच केले जाते. तर याच क्रूरतेला आळा घालण्यासाठी प्राण्यांविषयी संवेदनशीलता आणि आपुलकीची भावना जागृत करण्यासाठी पेटगाला हा पेट शो सदैव तत्पर असतो. पेटगाला पेट शो अंतर्गत आणि MARS PETCARE द्वारे आयोजित केलेल्या या कार्यक्रमाची उजवी बाजू म्हणजे दत्तक मोहिमेचा समावेश, या मोहिमेचा उद्देश म्हणजे शक्य तितक्या जास्त मांजरी आणि कुत्र्यांना अशा घरामध्ये प्रदान करायचे जिथे त्यांची विशेष काळजी आणि निगा राखली जाईल, हा उच्च उद्देश उराशी बाळगून हा कार्यक्रम रेखाटला जातो. इच्छुक सदस्य नक्कीच या कार्यक्रमाला विनामूल्य येऊन कार्यक्रमाची शोभा वाढवू शकतात. येत्या रविवारी पुणे येथे हा सर्वात भव्य दिव्य पाळीव प्राणी मेळावा आयोजित करण्यात आला आहे.

पेटगाला हा पाळीव प्राणी प्रेमींचा एक आकर्षक मेळावा आहे. या कार्यक्रमात पाळीव प्राण्यांचा आनंद साजरा करण्याची एक खास संधी प्रत्येकाला दिली जाईल. हा कार्यक्रम १३ नोव्हेंबर रोजी डेक्कन कॉलेज ग्राऊंडवर सकाळी १० पासून सुरू होणार आहे. फेलाइन क्लब ऑफ इंडिया (FCI) WHISKAS-MARS PETCARE या ब्रँडचे, पाळीव प्राण्यांचे अन्न आणि पोषण यामधील प्रमुख, संयुक्त विद्यमाने चार आंतरराष्ट्रीय परीक्षक या कार्यक्रमाचा निकाल जाहीर करतील. श्री. ॲलन रेमंड (ऑस्ट्रेलिया), श्रीमती जॅन रॉजर्स (यूएसए), मिस्टर फडली फुआद (इंडोनेशिया), मिस्टर इंद्रा लुबिस (इंडोनेशिया) हे या शोमध्ये चॅम्पियनशिप कॅट शोचे परीक्षण करणार आहेत. 200 हून अधिक मांजरींचा सहभाग असल्याची माहिती FCI चे अध्यक्ष श्री. साकिब पठाण यांनी दिली. पर्शियन, मेन कून, बंगाल आणि आमची स्वतःची इंडीमाऊ यांसारख्या विविध जाती कार्यक्रमादरम्यान उपस्थित असतील. इव्हेंटमध्ये पाळीव प्राण्यांच्या मनोरंजनासाठी काही खास मज्जा मस्ती ही अनुभवायला मिळणार आहे, जसे की डॉग रनिंग गेम्स, पूल पार्टी, पेट फॅशन शो, इतर खेळ इत्यादी उपक्रम राबविण्यात येतील. या कार्यक्रमाचा आस्वाद लुटण्यासाठी प्रत्येक प्राणिप्रेमीने आपल्या पाळीव प्राण्यांसह या कार्यक्रमाला हजेरी लावून कार्यक्रमाची शोभा वाढवावी ही विनंती.

आरोग्याकडे दुर्लक्ष करू नका
आरोग्य हीच संपत्ती आहे
शहरातील एक विश्वसनीय सुपर मार्केट
महावीर
घर संसार

• घाऊक आणि किरकोळ • किराणा, सुका मेवा, मसाले
• क्रॉकरी, घरगुती उपकरणे • घर साफ करणारे साहित्य, स्टील आणि ॲल्युमिनियम
• प्लास्टिकच्या वस्तू आणि बरेच काही
सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअप ऑर्डर आणि कोणतीही ऑर्डर 9850017181
वितरण स्थिती 9021395308 9657398232
घाऊक चौकशी 7620111118 9527111185
www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com
S.p. रोड, चेलीपुरा, शहागंज, औरंगाबाद
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर MIDC चिकलठाणा, औरंगाबाद

मनोजवं मारुततुल्यवेगमं जितेन्द्रियं बुद्धिमतां वरिष्ठम्।
वातात्मजं वानरयूथमुख्यं श्रीरामदूतं शरणं प्रपद्ये।।




श्री भद्रा मारोती औरंगाबाद

सौजन्य : जयसुख पटेल, जय भद्रा हनुमान सुखःतू रामायण, सिमंत गल्ली, शहागंज गांधी पुतळ्याजवळ, औरंगाबाद. मो : 9422201977




# गुंगीकारक औषध साठ्यासह एकाला अटक; आझादनगर पोलिसांची कारवाई

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** गुंगीकारक औषधांचा साठा विक्री करणाऱ्या एकाला आझादनगर पोलिसांनी रंगेहात पकडले. त्याच्याकडून 47 हजारांचा साठा जप्त करण्यात आला. शहरातील हमाल मापाडी सोसायटीत काल सायंकाळी ही छापा कारवाई करण्यात आली. नितीन पुंडलीक मुकूंदे (रा. हमाल मापाडी प्लॉट, धुळे) असे त्याचे नाव आहे. त्याने राहत्या घरात मानवी मेंदूवर विपरीत परिणाम करणारे गुंगीकारक औषधांचा साठा करून त्यांची बेकायदेशीर विक्री करीत असल्याची गुप्त माहिती आझादनगर पोलिसांना मिळाली होती. घराची झडती घेतली असता 47 हजार 300 रुपये किंमतीच्या रेक्सॉन टी सिरपच्या 440 औषधाच्या बाटल्या मिळून आल्या. पोकॉ सिध्दांत मोरे यांच्या फिर्यादीवरुन आझादनगर पोलिसात नितीन मुकूंदेविरोधात एनडीपीस ॲक्ट कलम 20 व 22 सह भांदवि कलम 328 प्रमाणे गुन्हा दाखल झाला आहे. ही कारवाई पोलीस अधिक्षक संजय बारकुंड, अपर पोलीस अधिक्षक किशोर काळे, सहा पोलीस अधिक्षक एस. ऋषिकेश रेड्डी यांच्या मार्गदर्शनाखाली आझाद नगर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक प्रमोद पाटील, सपोनि दीपक पावरा, हेकॉं प्रकाश माळी, पोना संदिप कढरे, योगेश शिंदे, पोकॉ शोहेब बेग, आतिक शेख, एस.एन.मोरे, एस.पी. शेंडे, हरीष गोरे, संतोष घुगे व समाधान पाटील यांच्या पथकाने केली आहे. पुढील तपास पोलिस निरीक्षक प्रमोद पाटील हे करीत आहेत.



# विनापरवाना खोदकाम करणाऱ्यावर कारवाई

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** तालुक्यातील वासडी नियतक्षेत्रातील कक्ष क्रमांक 67A मध्ये विनापरवाना खोदकाम करुन जेसीबीचे साह्याने रस्ता तयार करत असताना आढळुन आल्याने रितसर पंचनामा करुन जेसीबी क्रमांक MH20EJ5313 जप्त करुन ताब्यात घेण्यात आले. सदरील कार्यवाही एस.व्ही. मंकवार उपवनसंरक्षक औरंगाबाद(प्रा) एस.यू. शिंदे सहाय्यक वनसंरक्षक कन्नड यांचे मार्गदर्शनाखाली आर. एच साळुंखे वनपरिक्षेत्र अधिकारी कन्नड(प्रा), सुभाष नागरे वनपाल पिशोर, आर. जी. महाजन वनरक्षक वासडी, ए.एल. नागरगोजे वनरक्षक हस्ता, राजू जैस्वाल वनमजुर यांनी कार्यवाही केली. पुढील चौकशी वनपाल नागरे करत आहेत.

# बालविवाह रोखण्यासाठी 'ती' भारत जोडो यात्रेत

## 'लेक लाडकी'चा सामाजिक संदेश

आधुनिक केसरी न्यूज

**पार्डी, जि.नांदेड :** मी लहान असताना आणि मला खूप शिकायची इच्छा असताना, माझ्या मामांनी माझा विवाह निश्चित केला. अनेकदा विनवण्या करूनही माझे कोणी ऐकले नाही. तेव्हा मी धाडसाने आणि "लेक लाडकी" संस्थेच्या मदतीने लग्न रोखले. पण माझ्या जिल्ह्यात बालविवाहाचे प्रमाण प्रचंड आहे. राज्यात आणि देशातही तीच स्थिती आहे. हाच विषयावर मला राहुलजींशी बोलायचा आहे," असे सतरा वर्षांची युवती; सारिका पाखरे (मानूर, जिल्हा बीड ) सांगत होती, पदयात्रेत ती चालत होती. सामाजिक ज्वलंत प्रश्न प्राध्यान्याने हाताळून समाजात जनजागृती करणाऱ्या अनेक स्वयंसेवी संस्था 'भारत जोडो' यात्रेत जोडल्या गेल्या आहेत. साताऱ्यातील "लेक लाडकी" संस्था ही त्यापैकीच एक. "आमचा भाग दुष्काळी, त्यामुळे ऊसतोड कामगार जास्त. उसतोडीला जात असताना सोबत मुलींना घेऊन न जाता त्यांचे कोवळ्या वयात लग्ने करून आईबाप रिकामे होतात," ती व्याकुळ होऊन व्यथा मांडत होती. माझ्याप्रमाणेच माझ्या दोन मैत्रिणींचे बालविवाह सुद्धा मी रोखले आहेत. पण हे कायमस्वरूपी रोखून सामाजिक परिवर्तन घडवायचे असेल तर ग्रामीण भागात छोटे छोटे उद्योग उभारले जाणे गरजेचे आहे. त्यातून रोजगार वाढेल आणि आमच्या कुटुंबांचे स्थलांतर थांबेल. स्थलांतर थांबले की मुलींना घरी सुरक्षितपणे वावरता येईल, शिकता येईल मग बाल विवाह सहजपणे रोखता येतील. ही माझीच नव्हे महाराष्ट्रातील माझ्या सारख्या हजारो लेकींची व्यथा आहे. ती राहुलजींना मी सांगणार आहे..."असे सारिका म्हणाली. शुक्रवारी सकाळी सातच्या सुमारास नांदेडजवळील दाभाड येथून यात्रा सुरू झाली. तेव्हा संस्थेच्या प्रमुख वर्षा देशपांडे यांच्या नेतृत्वाखाली दहा सदस्य सारिका सोबत यात्रेत चालत होते. देशाच्या एकतेचा, अखंडतेचा, बंधुभाव आणि सर्वधर्म समभावाचा संदेशच्या बॅनरचे जॅकेट घालून ते यात्रेत सहभागी झाले आहेत. ते महाराष्ट्रात पुढील 9 दिवस चालणार आहेत.



# सुल्ताना तडवी यांना झोनल टिन कार्निरिटर पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** भोकरदन तालुक्यातील कोसगाव येथील ग्रामीण भागामधील एक छोट्याशा खेड्यागावातील आणि गोरगरीब आदिवासी कुटुंबातील सुल्ताना तडवी यांनी स्वतावरती विश्वास दाखवत आणि अंगामधे डोक्यामधे एकच ध्यास घेऊन जीद्द ठेऊन वाटचालीस सुरुवात केली विशेष म्हनजे या महिलेचे जास्त मोठे शिक्षण ही झालेले नाही त्यांच शिक्षण फक्त चौथ्या वर्गापर्यंत झालेले आहे आणि घरामधे पती मुलं बाळ कुटुंबाचा सांभाळ करुन हे पाऊल उचलले आणि एम आय लाईफ स्टाईल या प्राइवेट लिमीटेड कंपनीमधे जाइन होऊन चांगल्या प्रकारे जिद्दीने काम करुन फक्त ११महिन्यामधे चौथ्या रँक ला गरुड झेप घेतली पंतप्रधान विकास कौशल्य योजना अंतर्गत हे काम सुरु आहे एम आय डायरेक्ट सेलींग बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करुन देण्यात येतो असेही सुल्ताना तडवी यांनी सांगीतले. या सन्मान सोहळ्या दरम्यान स्टेजवरती एम आय लाईफ स्टाईल चे वरिष्ठ पदाधीकारी कृष्णा जाधव , गंगाधर पाटील ,बोंद्रे मडम , सोमनाथ कापसे जगन्नाथ जीवरग अंकुश जीवरग यांच्या हस्ते सुल्ताना तडवी यांना ट्राफी देऊन सन्मानित करण्यात आले यावेळेस , महाराष्ट्र एकलव्य आदिवासी विकास परिषद चे सिल्लोड तालुका अध्यक्ष सलाउद्दिन तडवी, रुकसाना तडवी त्यांच्या आई तायराबाई नामदार तडवी आणि शेकडो एम आय इंडस्ट्रीचे कर्मचारी पदाधीकारी या वेळेस उपस्थित होते.



# वंजारी महासंघाच्या शिष्टमंडळाने घेतली राज्यपालांची भेट

## विविध मागण्यांचे निवेदन सादर

आधुनिक केसरी न्यूज



**निफाड :** राज्याच्या कानाकोपऱ्यात कमी जास्त प्रमाणात विखुरलेला व जवळपास अंशी ते नव्वद विधानसभा मतदारसंघात निर्णायक असुन मागिल कित्येक वर्षे हा समाज राजकिय सत्ता स्वतःच्या दिशेने फिरवतो आहे . म्हणजे बहुसंख्य समाज ज्या दिशेने उभा राहिल तो राजकिय पक्ष सातत्याने सत्तेवर आरूढ होतो आणि समाजाच्या काही प्रमुख मागण्यांसह दिनांक 7/11/2022रोजी दुपारी 1 वाजता वंजारी महासंघ महाराष्ट्र राज्य चे शिष्टमंडळ डॉक्टर लक्षराज सानप राज्य सरचिटणीस यांच्या नेतृत्वात भेट घेतली समवेत गणेश खाडे, संस्थापक अध्यक्ष, मुंबई विभागीय अध्यक्ष तथा कामा हॉस्पिटलचे अधिक्षक डॉक्टर तुषार तात्याबा पालवे, अनिल सांगळे साहित्य आघाडी चे प्रदेश अध्यक्षसह भेट घेऊन खालील मागण्यांचे निवेदन राज्यपाल महोदय यांना सादर केले सदर निवेदनावर राज्यपाल महोदयांनी तातडीने सकारात्मकता दाखवत सदरील निवेदनाच्या अनुषंगाने राज्य शासनाला कार्यवाही करण्यात बाबत कळवले. निवेदनातील प्रमुख विषय समाजाचे दैवत संत अवजीनाथ महाराज, सद्गुरु संत वामन भाऊ महाराज, राष्ट्र संत भगवान बाबा यांच्या पुण्यतिथी व जयंती बाबत सर्व दिनदर्शिका यांनी नोंदी घेणे बाबत राज्य सरकारने परिपत्रक जारी करावे, संत अवजीनाथ महाराज यांचे समाधीस्थळ असणारे तीर्थक्षेत्र मिरपुर लोहारे अ वर्ग तीर्थक्षेत्र म्हणून घोषित करावे. भगवान गड पाथर्डी , गहिनीनाथ गड ता पाटोदा, अवजीनाथ महाराज मंदिर मिरपुर लोहारे तालुका संगमनेर या ठिकाणी पायाभूत सुविधा व विकासासाठी सन 2022, -23 या अर्थ संकल्पीय वर्षात शंभर कोटींचा निधी वितरित करावा.भटक्या विमुक्त प्रवर्गातील मुलांना विदेशी शिक्षण घेता यावे यासाठी राष्ट्र संत भगवान बाबा यांच्या नावाने शिक्षण उत्थान योजना कार्यान्वित करून वर्षी किमान एक हजार मुलांना शिष्यवृत्ती उपलब्ध होईल अशी योजना कार्यान्वित करावी. राज्यातील सर्व जिल्हा स्तरीय बसस्थानक येथुन अवजीनाथ महाराज मिरपुर लोहारे संगमनेर, संत सद्गुरु वामनभाऊ महाराज गहिनीनाथ गड पाटोदा, राष्ट्र संत भगवान बाबा भगवान गड येथे बस सेवा नियमित चालू करावी या प्रमुख मागण्या घेऊन वंजारी महासंघ महाराष्ट्र राज्याचे शिष्टमंडळाने महामहिम राज्यपाल यांची भेट घेऊन निवेदन देऊन सकारात्मक चर्चा झाली व राज्यपाल महोदयांनी तात्काळ दखल घेऊन राज्यसरकारला मागण्या संदर्भात कळविले या संदर्भात वंजारी महासंघ महाराष्ट्र राज्यच्या वतीने महामहिम राज्यपाल भगतसिंगजी कोशयरी यांचे आभार व्यक्त केले.

# प्रेमीयुगुलाने केली रेल्वेखाली उडी घेऊन आत्महत्या : भोकर शहरातील घटना

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** आदिलाबादहुन मुंबईकडे जाणारी नंदिग्राम



एक्सप्रेस रेल्वे आज दि. ११ नोव्हेंबर २०२२ रोजी दूपारी अंदाजे साडेतीन वाजेच्या सुमारास रेल्वेगेट जवळ येताच येथील रेल्वे उड्डान पुला खाली भोकर येथील मुलगा शिवराज मनोज कातमवार वय २४ वर्षे रा कासारगल्ली भोकर व रिठ्ठा येथील मुलगी कु धारा माधव मोरे वय १८ वर्षे रा रिठ्ठा या प्रेमी युगुलाने धावत्या रेल्वे खाली आत्महत्या केल्याची घटना शुक्रवारी दुपारी नंदीग्राम एक्सप्रेस च्या वेळेत घडली धावत्या नंदीग्राम एक्सप्रेस रेल्वे गाडीखाली आत्महत्या केल्याची घटना घडली दरम्यान दोघांचे मृतदेहाचे तुकडे झालेले होते सदरील झालेली घटना पहाण्यासाठी एकच गर्दी झाली शहराच्या मध्यभागी रेल्वे गेट असल्यामुळे या ठिकाणी नागरिकाची ये जा मोठ्या प्रमाणात असते आदिलाबाद - मुंबई हे विशेष रेल्वे गाडी अंदाजे साडेतीन वाजता दुपारी रेल्वे पुलाखाली आली असता सदरील घटना घडली असून रेल्वे प्रशासनासना कडुन माहिती मुदखेड रेल्वे पोलीसांनी दिली.माहिती मिळताच रेल्वे पो स्टे चे ठाणेदार सुरेश वुनवने यांचे मार्गदर्शनाखाली रेल्वे पो कॉ संदीप पोपपलवार , रेल्वे पो कॉ दत्ता मुगल, नाईक अनंता आगाव व सहकारी पोलिसांनी घटनास्थळी भेट देवून पंचनामा केला. दरम्यान दोघांचे मृतदेहाचे तुकडे झालेले होते.मृतदेह शासकिय रुग्णालय भोकर येथे आणून शवविच्छेदनानंतर नातेवाईकांच्या ताब्यात दिले.याप्रकरणी रेल्वे पो स्टे मध्ये आकस्मिक मृत्यु ची नोंद केली सदरील दुर्देवी मृत्यू झाल्यामुळे नागरिकांमध्ये हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

# सरकारला गंभीर परिणाम भोगावे लागतील : अमोल मिटकरी

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राष्ट्रवादी कॉँग्रेसचे कळवा-मुंब्रा मतदारसंघातील आमदार जितेंद्र आव्हाड यांना ठाण्यातील वर्तक नगर पोलिसांनी अटक केल्यानंतर राजकीय वातावरण तापले आहे. राष्ट्रवादी कॉँग्रेसकडून या अटकेचा तीव्र शब्दांमध्ये निषेध केला जात आहे. 'हर हर महादेव' चित्रपटाच्या शोदरम्यान ठाण्यात झालेल्या राड्यानंतर जितेंद्र आव्हाडांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानंतर आज त्यांना अटक करण्यात आली आहे. यासंदर्भात संताप व्यक्त करताना राष्ट्रवादी कॉँग्रेसचे आमदार अमोल मिटकरी यांनी एकनाथ शिंदे सरकारला गंभीर इशारा दिला आहे.



# मातंग एकता आंदोलनाच्या वतीने नवनियुक्त जिल्हाधिकाऱ्यांचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** मातंग एकता आंदोलन या राज्यव्यापी सामाजिक संघटनेच्या वतीने औरंगाबाद जिल्हाधिकारी कार्यालयात नव्याने रुजू झालेले नवनियुक्त जिल्हाधिकारी मा.आस्तिककुमार पांडेय यांची सदिच्छा भेट घेऊन सत्कार करण्यात आला. यांवेळी संघटनेचे सल्लागार तथा जिल्हा नियोजन समितीचे सदस्य मा.राजु भाऊ आहिरे, जिल्हाध्यक्ष तथा पत्रकार संदीप मानकर, महिला आघाडी जिल्हाध्यक्षा राजश्री ताई साठे, जिल्हा संपर्कप्रमुख अंबादास पवार, जिल्हा संघटक भरत मानकर, सिल्लोड तालुका उपाध्यक्ष सुरेश चंदनशिव आदींची उपस्थिती होती..!

# पैठण येथील अन्नछत्रालयास स्वामी हरीचैतन्य महाप्रभूंची भेट

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** संत एकनाथ महाराज समाधी मंदिरात गेल्या पाच वर्षापासून अखंडपणे सुरू असलेल्या हरिकृपा सेवा समिती व संत एकनाथ महाराज मंदिर संचलित प्रसादालयास स्वामी हरि चैतन्य महाप्रभु यांनी शुक्रवारी सकाळी भेट देवून नाथ महाराज समाधीचे दर्शन घेतले. त्याच्या आगमना प्रसंगी वारकर्यानी टाळ मृदंगाच्या गजरात हरि बोल, हरि बोलचा गजर करत स्वागत केले. यावेळी नाथ संस्थानच्या वतीने स्वामीजीचे नाथाची प्रतिमा देवुन स्वागत करण्यातआले. हरिचैतन्य महाराज यांच्या प्रेरणेनेच पैठण येथील नाथ महाराज मंदिरातील अन्नछत्रालय गेल्या पाच वर्षांपासून सुरू आहे त्याच अन्नछत्रालयास शुक्रवारी भेट देवून महाप्रसादाचा लाभ घेतला याप्रसंगी हरिकृपा सेवा समितीच्या वतीने अध्यक्ष सतिष उदावंत यांनी स्वामिजीचे स्वागत केलेयावेळी हरिकृपा सेवा समितीचेगणपत मिटकर्री, सेलूकर मामा, ठोसर साहेब, विठ्ठल परदेशी, लक्ष्मण लाड, परसराम परदेशी, पंडीतराव औटे, लिंबाची चौधरी शिवाजी कोलतेसह सेवेकरी उपस्थित होते.




काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत

(रविवारी मोफत तपासणी)

नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!

(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)



डॉ. शेख ए.एच.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# राज्यपालांच्या हस्ते जेनेटिक प्रयोगशाळेचे उद्घाटन

## जनुकविज्ञानाच्या अभ्यासातून भविष्यातील पिढ्या वाचवण्याचे पवित्र काम : राज्यपाल

आधुनिक केसरी न्यूज



**पुणे :** जनुकविज्ञानाच्या (जेनेटिक सायन्स) माध्यमातून केवळ आजारांचे निदान करणे एवढेच नाही तर आजारांची कारणे आणि त्यावरील उपचार शोधणे आदी सर्व बाबी करुन भविष्यातील अनेकाअनेक पिढ्या वाचवण्याचे अत्यंत पवित्र काम केले जाते, असे प्रतिपादन राज्यपाल भगत सिंह कोश्यारी यांनी केले. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिकच्या (एमयुएचएस) पुणे विभागीय केंद्राने उभारलेल्या डॉ. घारपुरे स्मृती जेनेटिक प्रयोगशाळा व कर्करोग संशोधन केंद्राचे (जीन हेल्थ) उद्घाटन राज्यपाल श्री. कोश्यारी यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. विद्यापीठाच्या कुलगुरु लेफ्ट. जन. माधुरी कानिटकर (से. नि.), राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव सुजाता सौनिक, इंडियन ड्रग रिसर्च असोसिएशन ॲण्ड लॅबारेटरीचे चेअरमन सुहास जोशी, विद्यापीठाचे प्रति कुलगुरु डॉ. मिलिंद निकुंभ, कुलसचिव डॉ. राजेंद्र बंगाळ आदी उपस्थित होते.

सर्व नवीन ज्ञान हे अंतिमतः प्रयोगशाळेत निर्माण होते अशी आपली भावना असल्याचे सांगून राज्यपाल म्हणाले, पूर्वी वैद्य प्राचीन वैद्यकीय ज्ञानाचा वापर करुन स्वतः निदान करायचे आणि स्वतःच औषधे बनवायचे. आता आधुनिक ॲलोपॅथी उपचार पद्धतीत औषध निर्माते, निदान प्रयोगशाळा, विशेषज्ञ डॉक्टर्स, औषधे, उपचार साधने यासाठी वेगवेगळ्या यंत्रणा अशी एक साखळी आहे. परंतु, या साखळीमध्ये सर्वात महत्त्वाची बाब आहे म्हणजे येथे होत असलेले शोध, नाविन्य, संशोधन आहे. या आरोग्य विज्ञानातील प्रारंभिक बाबी आहेत. यानंतर डॉक्टर निदान आणि त्याआधारे उपचार करतात. आरोग्य क्षेत्रातील संशोधन, आजारांचा शोध, रोगनिदान आणि उपचारपद्धतीचा शोध आदी बाबी तपश्चर्या आणि खूप कालावधीची प्रक्रिया आहे. त्यासाठी मोठा संयम, सहकार्य, समर्पणाची आवश्यकता असते. जनुकीय विज्ञानाच्या क्षेत्रात सखोल ज्ञान प्राप्त करणे गरजेचे आहे. पुढील पिढ्यांच्या कल्याणासाठी हे आवश्यक आहे, असेही राज्यपाल कोश्यारी म्हणाले. यावेळी कुलगुरु ले. जन. कानिटकर म्हणाल्या, दृष्टीकोन आणि त्यानुसारची कृती जग बदलू शकते. हे लक्षात घेऊन तसेच शिक्षण, सार्वजनिक आरोग्य शिक्षण आणि आरोग्यासाठी संशोधन या बाबी एकत्र कशा करता येईल हा दृष्टीकोन ठेऊन या 'मॉलेक्युलर डायग्नोस्टिक इन जेनेटिक' लॅबची उभारणी करण्यात आली आहे. हे करत असताना या केंद्राचे रुग्णाची काळजी हे मध्यवर्ती काम राहील. त्यासोबतच जेनेटिक्स विषयात क्षमता बांधणी व अभ्यासक्रम राबवणे आणि त्याचसोबत संशोधनाचे महत्त्वपूर्ण काम येथे केले जाईल. ही प्रयोगशाळा राज्यातील सर्व वैद्यकीय महाविद्यालये आणि शासकीय रुग्णालयांना या क्षेत्रातील निदानांसाठी उपलब्ध असेल असेही त्या म्हणाल्या. या क्षेत्रातील आजारांचे निदान अत्यंत खर्चिक असल्याने सर्वसामान्य रुग्णांसाठी अत्यंत वाजवी दरात या प्रयोगशाळेमुळे तपासण्या होतील, असेही त्या म्हणाल्या. यावेळी आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या माजी कुलगुरु डॉ. मृदुला फडके यांचा ध्वनीचित्रफीत संदेश दाखवण्यात आला. तसेच आरोग्य विज्ञान विद्यापीठ आणि नॅशनल एड्स संशोधन संस्था (नारी) तसेच अन्य संस्थांशी सामंजस्य करारांचे आदान-प्रदान करण्यात आले. मानसिक आरोग्यासाठी लाभदायक असे 'मेंटल हेल्थ ॲण्ड नॉर्मल्सी ऑगमेंटेशन सिस्टीम' अर्थात 'मानस ॲप'चे अनावरण राज्यपालांच्या हस्ते करण्यात आले. हे ॲप अत्यंत उपयुक्त असून त्यामध्ये प्रादेशिक भाषांची व्यवस्था केल्यास अधिक लोकांपर्यंत पाहोचेल असे राज्यपाल यावेळी म्हणाले. कार्यक्रमास 'नारी' रोष्ट्रीय पेशी विज्ञान संस्था (एनसीसीएस), विद्यापीठाचे व्यवस्थापन परिषदेचे सदस्य, आर्मड् फोर्सेस मेडिकल कॉलेजसह अन्य वैद्यकीय महाविद्यालयांचे अधिष्ठाता, सी-डॅकचे प्रतिनिधी, राष्ट्रीय मानसिक आरोग्य आणि स्नायू विज्ञान संस्थान, बेंगळुरूचे (निमहान्स) चे प्रतिनिधी आदी उपस्थित होते.

# बोलीभाषेतून प्रमाण भाषेकडे उपक्रमाची यशस्विता

## चारबन शाळेचे शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश

आधुनिक केसरी न्यूज




**जळगाव जामोद :** तालुक्यातील डोंगराळ, आदिवासी भागातील जिल्हा परिषद मराठी प्राथमिक शाळा चारबन च्या विद्यार्थ्यांनी नुकत्याच जाहीर झालेल्या शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश संपादित केले असून 14 विद्यार्थी पात्र ठरले आहेत. तालुक्यातील आदिवासी भागात जि.प.शाळा चारबन येथे आदिवासी विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढीसाठी विविध नाविन्यपूर्ण उपक्रम चारबन शाळेतील शिक्षकांकडून राबविले जातात.त्यापैकी बोली भाषेतून प्रमाण भाषेकडे हा उपक्रम आदिवासी विद्यार्थ्यांना पावरी भाषेतून मराठी भाषेकडे वळविण्यासाठी उपयुक्त ठरत आहे.त्यासाठी मुख्याध्यापक गोवर्धन दांडगे व शिक्षक दीपक उमाळे यांनी विद्यार्थ्यांची पावरी बोलीभाषा अवगत करून उमाळे यांनी विद्यार्थ्यांसाठी पावरी-मराठी असा शब्दकोश पण निर्माण केला आहे.त्याचाच परिणाम विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीवर होऊन त्यांना प्रमाणभाषेतील मराठीचे आकलन होणे सोपे झाले आहे.या उपक्रमाची यशस्वीता म्हणजे सन 2022 मध्ये झालेल्या इयत्ता 5 वीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत जि.प. शाळा चारबन चे 14 विद्यार्थी पात्र ठरले आहेत. बोलीभाषेचे आवाहन शाळेतील शिक्षकांनी संधी म्हणून स्वीकारल्याचे यावरून दिसून येते.चारबन शाळेचे शिष्यवृत्ती परीक्षेला एकूण 19 विद्यार्थी बसले होते त्या पैकी 18 विद्यार्थ्यांची परीक्षेला उपस्थिती होती व 1विद्यार्थी गैरहजर होता त्यापैकी 14 विद्यार्थी पात्र झाल्याने जि.प.शाळा चारबन च्या शाळेचे सर्वच स्तरातून कौतुक होत आहे.आपल्या यशाचे श्रेय विद्यार्थ्यांनी गटशिक्षणाधिकारी नारायण फाळके,केंद्रप्रमुख खेर्डा तथा विस्तार अधीकारी जावरकर साहेब,शाळेचे मुख्याध्यापक गोवर्धन दांडगे,दीपक उमाळे,माधव मोसंबे,ममता गावित यांना दिले आहे.




# फडणवीसांनी कणखर भूमिका घेतल्यामुळे प्रतापगडावरची अतिक्रमणे हटली

## भाजपा आ. नितेश राणे यांचे प्रतिपादन

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** प्रतापगडावर अफझलखानाच्या कबरीजवळची अतिक्रमणे हटविण्याची मागणी अनेक वर्षांपासून होत होती. मात्र त्याकडे दुर्लक्ष केले गेले. कणखर भूमिका घेत ही अतिक्रमणे हटविल्याबद्दल महाराष्ट्राच्या शिवप्रेमी जनता उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अभिनंदन करीत आहे, असे प्रतिपादन आ. नितेश राणे यांनी शुक्रवारी केले. भाजपा प्रदेश कार्यालयासमोर झालेल्या सभेत आ. राणे बोलत होते. अफझलखानाच्या कबरीजवळची अतिक्रमणे हटविल्याबद्दल या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. भाजपा प्रदेश कोषाध्यक्ष आ. मिहीर कोटेचा, प्रदेश मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये, भारतीय जनता युवा मोर्चा मुंबईचे अध्यक्ष तेजिंदर तिवाना आदी यावेळी उपस्थित होते. आ.राणे म्हणाले की, प्रतापगडावरील अफझलखानाच्या कबरीजवळची अतिक्रमणे हटविण्याची मागणी अनेक दिवसांपासून होते आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव घेऊन राजकारण करणाऱ्या पक्षांनी या मागणीकडे दुर्लक्ष केले. शिवप्रेमींच्या भावनेचा अनादर केला. हिंदुत्ववादी म्हणविणाऱ्या पक्षांनीही या मागणीकडे लक्ष दिले नव्हते. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ही अतिक्रमणे हटविण्याची ठाम भूमिका घेतली. याबद्दल महाराष्ट्र उपमुख्यमंत्री फडणवीस यांचा आभारी आहे. महाराष्ट्रात धार्मिक स्थळे, ऐतिहासिक स्थळांच्या ठिकाणी अतिक्रमणे झाली आहेत. विशाळगड, मुंबईतील शिवडीचा किल्ला अशा ठिकाणी झालेली अतिक्रमणे यापुढील काळात हटविली जातील. हिंदूंच्या धार्मिक स्थानांकडे यापुढे वाकड्या नजरेने पाहिले तर ते सहन केले जाणार नाही, असेही आ. राणे यांनी सांगितले.

# गलवाडा येथे शेतकऱ्यांसाठी चर्चासत्र

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** गलवाडा (सो) येथे माझा एक दिवस माझ्या बळीराजासाठी उपक्रमांतर्गत शेतकऱ्यां सोबत चर्चासत्र सोयगाव कृषि विभागामार्फत "माझा एक दिवस माझ्या बळीराजासाठी" कार्यक्रमांतर्गत शेतकऱ्यांसाठी रब्बी हंगाम मार्गदर्शन व कृषी विषयक समस्या जाणून घेण्यासाठी चर्चा सत्र घेण्यात आले. या वेळी तालुका कृषि अधिकारी एस जी वाघ यांनी एक दिवस माझ्या बळीराजासाठी या उपक्रमांतर्गत प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले. गलवाडा येथे राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियाना अंतर्गत रब्बी ज्वारीचा प्रकल्प राबविण्यात येणार असून यासाठी लाभार्थी निवड व बीज प्रक्रिया प्रात्यक्षिक कृषि सहाय्यक पी व्ही जाधव यांनी करून दाखवले. यावेळी कृषि यांत्रिकीकरण योजना, ठिबक सिंचन योजना, पीक विमा योजना, ई पीक पाहणी, पीएम किसान योजना व प्रधानमंत्री सुक्ष अन्न प्रक्रिया उद्योग योजना यांची माहिती एच बी देशमुख कृषि पर्यवेक्षक व ए एस महाजन बी टी एम यांनी दिली. आजच्या कार्यक्रमात ग्राम पंचायत सदस्य, पोलीस पाटील, प्रगतशील शेतकरी व महिला लाभार्थी यांची उपस्थिती होती.

# एनटीव्हीच्या माध्यमातून होणारे सामाजिक कार्य कौतुकास्पद : मुख्यमंत्री

## समाजातील वास्तविक चित्र प्रदर्शित करणारा हा अंक : राज्यमंत्री बच्चू कडू

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** महाराष्ट्राची आग्रगण्या व्रत्तवाहिनी, जनमानसाचा प्रतिबिंब म्हणून ओळखली जाणारी मराठी व्रत्तवाहिनी NTV न्यूज मराठीच्या दीपावली विशेषांक २०२२ चा "वास्तव दी रिऍलिटी" या अंकाचे राज्याचे मुख्यमंत्री मा.एकनाथजी शिंदे, शिक्षण मंत्री तथा पक्षाचे प्रवक्ते दीपक केसरकर आणि माजी राज्यमंत्री तथा प्रहार जणशक्ती पक्षाचे सर्वेसर्वा बच्चू भाऊ कडू यांच्या हस्थे मोठ्या थाटात दिनांक ९ नोव्हेंबर रोजी मंत्रालयात पार पडला. सालाबाद प्रमाणे यंदा एन टी व्ही वृत्तवाहीनीने आपल्या असंख्य प्रेक्षक तथा वाचकांसाठी देशातील वास्तव चित्र रेखाटत,"वास्तव द रिऍलिटी" या शीर्षकाखाली दीपावली अंक प्रकाशित केला.या अंकाचे प्रकाशन मुंबई-मंत्रालयात मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे,शिक्षण मंत्री तथा बाळासाहेबांची शिवसेना प्रवक्ते दीपक केसरकर, माजी राज्यमंत्री तथा प्रहार जनशक्ती पक्षाचे सर्वेसर्वा बच्चू भाऊ कडू,उमरगा लोहारा तालुक्याचे आमदार ज्ञानराज चौगुले,बच्चू भाऊ यांचे स्वीय सहाय्यक सातलिंग स्वामी आणि NTV वृत्तवाहिनीचे संपादक एकबाल शेख यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले. यावेळी विविध विभागाचे सचिव,स्वीय सहाय्यक यांच्यासह विविध मान्यवर,एन टी व्ही विभागीय प्रतिनिधी सचिन बिद्री,उस्मानाबाद जिल्हा प्रतिनिधी अयुब शेख आणि राज्यभरातून आलेले दिव्यांग बंधू भगिनी मोठ्या संख्येने उपास्थित होते. दरम्यान या प्रकाशन सोहळ्यात एन टी व्ही च्या माध्यमातून पत्रकारितेसह सचिन बिद्री यांचे होणारे सामाजिक कार्य, विशेषतहा बालविवाह रोखून मुली व मुलींच्या पालकांत शिक्षणाबाबत होणारी जणजागृतीबाबत मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे व बच्चू कडू यांनी कौतुक करीत पाट थोपटली.



# राष्ट्रवादी काँग्रेसचे आ. जितेंद्र आव्हाडांना अटक

## ‘हर हर महादेव’ चित्रपटाचा शो राष्ट्रवादीने बंद पडल्याप्रकरणी अटकेची कारवाई

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** ठाण्यातील विवीयाना मॉलमधील सिनेमागृहात सोमवारी रात्री १० वाजता सुरू झालेल्या ‘हर हर महादेव’ चित्रपटाचा शो राष्ट्रवादीने बंद पडल्याप्रकरणी राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार जितेंद्र आव्हाड यांना अटक करण्यात आली आहे. जितेंद्र आव्हाड यांनीच ‘एबीपी माझा’शी बोलताना ही माहिती दिली आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित चित्रपटांमध्ये इतिहासाची मोडतोड करण्यात येत असल्याचा आरोप करत राष्ट्रवादीने प्रेक्षकांना सिनेमागृहात बाहेर जाण्याचे आवाहन केले. त्यानंतरही सिनेमागृहात बसून असलेल्या प्रेक्षकांना राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी हुसकावून लावल्याने किरकोळ वादाचे प्रसंगही घडले. त्यात एका प्रेक्षकाला मारहाणही झाली. याच प्रकरणामध्ये आव्हाड यांच्यासहीत राष्ट्रवादीचे आनंद परांजपे यांना पोलीस स्थानकामध्ये बोलवून घेण्यात आलं आणि नंतर अटक करण्यात आली. जितेंद्र आव्हाड यांनीच यासंदर्भात ‘एबीपी माझा’ला माहिती दिली. दुपारच्या सुमारास विवीयाना मॉल ज्या वर्तकनगर पोलीस स्थानकाअंतर्गत येतो त्या पोलीस स्थानकामध्ये आव्हाड यांना बोलवण्यात आले. त्यानंतर त्या ठिकाणी ठाण्याचे डीसीपी पोहोचले आणि त्यांनी आव्हाड यांना अटक करण्यात येत असल्याची माहिती दिली. कार्यकर्त्यांची मोठी गर्दी सध्या वर्तकनगर पोलीस स्थानकाबाहेर आहे. आव्हाड बाहेर येईपर्यंत आम्ही इथून



हलणार नाही अशी भूमिका कार्यकर्त्यांनी घेतली असून परिसरातील पोलीस बंदोबस्त वाढवण्यात आला आहे.

आव्हाड यांनी यासंदर्भात, “मला पोलीस स्थानकात बोलवलं. नोटीस घ्यायला बोलवलं. त्यावेळेस मला मुंबईला जायचं असल्याने मीच येतो पोलीस स्थानकात नोटीस घ्यायला असं सांगितलं आणि इथं आलो. त्यानंतर मी इथं चहा पीत असतानाच डीसीपी राठोड आले. त्यांची हतबलता चेहऱ्यावर दिसत होती. त्यांनी मला तुम्हाला अटक करावी लागेल असं म्हणाले,” अशी माहिती दिली. “हे पोलिसी कायदे आहेत. चित्रपटाचं विकृतीकरण झालेलं हे प्रकरण. या चित्रपटामधून छत्रपती शिवाजी माहाराजांबरोबरच मराठा समाजाची बदनामी झाली. त्यावर आक्षेप घेतल्याने कारवाई होत असेल तर मी महाराजांचा मोठा रक्षक, अभ्यासक आहे. हे सरकार मला रोखू शकत नाही. हे सरकार महाराजांना बदनाम करणाऱ्यांचं आहे की रोखणाऱ्यांचं? अनैतिहासिक इतिहास दाखव्यासाठी अटक होणार असेल तर मी जेलमध्ये जाईल. जामीन पण करणार नाही,” असंही आव्हाड म्हणाले. “थोडी धक्काबुक्की झाली ती कार्यकर्त्यांमध्ये झाली. पण मी या अटकेचं स्वागत करतो. महाराष्ट्राला पोलीस राजची ओळख माझ्या अटकेमुळे होईल. आणि यात कसला जामीन. घरी जेवायचं तर जेलमध्ये जेऊ,” असं म्हणत आव्हाड यांनी जामीन मागणार नाही, असं स्पष्ट केलं. पोव्हिजनल एफआयआरमधील कलमं बेलेबल आहेत. अडकवण्यासाठी स्पेशल कलम शोधून आणलं आहे. कट केला आहे. सरकार कट करत आहे. पोलीस हतबल आहेत. पोलीस हे पोलीस राहिलेच नाहीत ठाण्यात. प्रत्येक पोलीस स्थानकाबाहेर बाळासाहेबांची शिवसेना अशा पाट्या लावणार आहेत. मला कोणी आदेश दिलेत माहिती नाही. पण जनतेला कळालं आहे मी कोणाबद्दल बोलतोय,” असं आव्हाड मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचा थेट उल्लख न करता म्हणाले.

# एकही शेतकरी पीकविम्यापासून वंचित राहणार नाही : कृषिमंत्री अब्दुल सत्तार

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** राज्यात नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांच्या विम्याच्या प्रलंबित प्रस्तावांवर पाच दिवसात कार्यवाही करुन येत्या आठ दिवसांच्या आत शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर विम्याची रक्कम जमा करावी, अशा सूचना राज्याचे कृषिमंत्री अब्दुल सत्तार यांनी दिल्या. राज्यातील एकही शेतकरी मदतीपासून वंचित राहणार नाही, अशी ग्वाही त्यांनी दिली.

विभागीय आयुक्त कार्यालयात कृषिमंत्री सत्तार यांनी प्रधानमंत्री पीक विमा योजना खरीप 2022 मधील झालेल्या नुकसानीसंदर्भात आढावा घेतला. यावेळी विभागीय आयुक्त सुनील केंद्रेकर, जिल्हाधिकारी अस्तिक कुमार पाण्डेय, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना, कृषी सहसंचालक डॉ.दिनकर जाधव यांच्यासह दृकश्राव्य प्रणालीद्वारे कृषी विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, कृषी विभागाचे मुख्य सांख्यिकीय अधिकारी विजय कुमार आवटे, विभागीय व्यवस्थापक शकुंतला शेट्टी, गिरीमेश शर्मा, समीर सावंत तसेच विमा कंपन्यांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

कृषिमंत्री सत्तार म्हणाले, शेतकऱ्यांच्या विम्याच्या प्रश्नावर शासनाकडून सातत्याने आढावा घेतला जात आहे.

विम्याचे पैसे शेतकऱ्यांना मिळाले नाहीत तर, चालढकल करणाऱ्या विमा कंपन्यांना जबाबदार धरून कारवाई करण्यात येईल. स्थानिक नैसर्गिक आपत्ती अंतर्गत एकूण प्राप्त सूचना 51 लाख 31 हजार पैकी झालेले सर्वेक्षण 46 लाख 9 हजार व अद्यापही प्रलंबित असलेले सर्वेक्षण 5 लाख 21 हजार तातडीने पूर्ण करावे. नैसर्गिक आपत्तीत निश्चित नुकसान भरपाई रुपये 1074 कोटी 17 लाख 77 हजार अर्जांचे नुकसान भरपाई रक्कम विमा कंपनीकडून निश्चित करणे बाकी आहे. ती रक्कम तत्काळ निश्चित करण्याच्या सूचना सत्तार यांनी दिल्या. नैसर्गिक आपत्तीत




निश्चित झालेल्या 1073 कोटी रुपये नुकसान भरपाई पैकी फक्त 96.53 कोटी रक्कम 3 लाख शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर जमा झाली आहे. उर्वरित रक्कम भारतीय कृषी विमा कंपनी आणि युनायटेड इंडिया इंश्युरन्स आणि इतर सर्व कंपन्यांनी तातडीने जमा करण्याच्या सूचना देत मध्य हंगाम प्रतिकूल परिस्थितीमध्ये एकूण 16 जिल्ह्यांनी अधिसूचना निर्गमित केल्या. त्यापैकी अकोला, अमरावती, सोलापूर, जिल्ह्यांमध्ये विमा कंपन्यांनी आक्षेप घेतले आहेत. त्या जिल्ह्यांच्या जिल्हाधिकाऱ्यांशी तातडीने भेटून कंपन्यांनी शंकेचे निराकरण करुन लवकरात लवकर ही रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्याच्या सूचनाही श्री.सत्तार यांनी दिल्या.

मराठवाड्यातील नांदेड, हिंगोली आणि परभणी जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांचे नुकसान झाले असून येथील 5 लाख शेतकऱ्यांचे सर्वेक्षण झाले असून उर्वरित 21 हजार शेतकऱ्यांचे सर्वेक्षण संबंधित यंत्रणेने तातडीने करावे. लातूर आणि बीड जिल्ह्यातील तांत्रिक अडचण दूर करण्यासाठी तत्परतेने कार्यवाही करावी. उस्मानाबाद जिल्ह्यातील विम्यासंदर्भात सुप्रिम कोर्टाने दिलेल्या आदेशाप्रमाणे विमा कंपनीने त्वरीत शेतकऱ्यांच्या बँक खात्यात विम्याची रक्कम जमा करावी, असेही ते म्हणाले. प्रत्येक तालुक्यात एक व्यक्ती नेमून ऑफलाईन अर्ज देखील ऑनलाईन करुन घ्यावा. केवळ अतिवृष्टीमुळेच नाही तर सततच्या पावसाने देखील शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. त्यामुळे शासनाच्या पंचनाम्याप्रमाणे विमा कंपन्यांना एनडीआरएफच्या नियमानुसार नुकसान भरपाई द्यावीच लागेल असा आदेश देत संबंधित अधिकाऱ्यांनी देखील विमा कंपन्यांकडे पाठपुरावा करुन एकही शेतकरी मदतीपासून वंचित राहणार नाही याबाबतची दक्षता घ्यावी असे श्री.सत्तार यांनी सांगितले. बैठकीत जालना, बीड, हिंगोली आणि लातूर जिल्हाधिकाऱ्यांनी देखील जिल्ह्यातील अडचणींसंदर्भात सविस्तर चर्चा केली. यावेळी विविध यंत्रणांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

# नाट्यदिग्दर्शक अरविंद जागीरदार यांचे निधन

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** आकाशवाणीचे प्रख्यात अरविंदमामा, आकाशवाणीचे माजी



कार्यक्रम निर्माते व नाट्यदिग्दर्शक अरविंद जागीरदार यांचे निधन आकाशवाणीचे माजी कार्यक्रम निर्माते, तिथे बालविहारमधून अरविंदमामा म्हणून ख्याती पावलेले प्रसिद्ध नाट्यदिग्दर्शक, अरविंद जागीरदार यांचे पुणे मुक्कामी आज पहाटे वृद्धापकाळाने निधन झाले. महाराष्ट्र राज्य नाट्य महोत्सवात अरविंद जागीरदार यांना अभिनय, दिग्दर्शनाची अनेक पारितोषिके मिळाली होती. विदर्भातल्या बालनाट्य चळवळीचे जे प्रणेते ठरले त्यात त्यांनी स्थापन केलेली 'रंगरेखा' संस्था पुढे नाट्यक्षेत्रात भरपूर नावारूपाला आली होती. त्यांचा जन्म २१ ऑगस्ट,१९३१ चा.बालपण खामगाव व मोर्शी येथे गेले तर महाविद्यालयीन शिक्षण विदर्भ महाविद्यालय,अमरावती येथे झाले होते. कॉलेजमध्ये असताना क्रिकेटचे कर्णधार असायचे. आकाशवाणी वरून मराठीतून समालोचनही त्यांनी केले होते. मृत्युसमयी त्यांचे वय ९१ वर्षाचे होते. आकाशवाणीत त्यांनी शैक्षणिक कार्यक्रम विभाग प्रमुख आणि बालविहार प्रमुख म्हणूनसुद्धा जबाबदारी सांभाळली होती. अरविंदमामा नावानेच ते बालविहारचे जे कार्यक्रम करत ते अतिशय लोकप्रिय ठरले होते.बालविहारला त्यांनीच उत्तम आकार दिला होता. १९८४ ला त्यांना आकाशवाणी दिल्लीला कार्यक्रम निर्माता म्हणून पाठवले गेले होते. तिथे सहा वर्षे त्यांचे वास्तव्य होते. १९८२ च्या सुमारास आकाशानंद, पुरुषोत्तम दारव्हेकर, यशवंत देव आणि अरविंद जागीरदार हेच नागपूर आकाशवाणीचे आधारस्तंभ होते. नागपुर आकाशवाणीवर अरविंदमामा आणि कुंदाताई या बालविहार मधील व्यक्तिरेखांनी तो काळ गाजवला होता. विदर्भ साहित्य संघाच्या नाट्यसमितीतही त्यांनी कार्य केले.बराच काळ त्यांचा विदर्भ साहित्य संघाशी संबंध राहिला. मला काही आठवत नाही या वयाच्यापंच्याहत्तराव्या वर्षी त्यांनी अल्झायमर सारख्या दुर्धर रोगावर लिहिलेल्या नाटकाला अमरावती प्रादेशिक केंद्रावर स्पर्धेत प्रथम पारितोषिक मिळाले होते. निवृत्तीनंतर त्यांचे अठरा वर्षे वास्तव्य ठाणे येथे होते. तिथे देखील त्यांनी 'उत्तरायण' नावाची ज्येष्ठ नागरिकांची संस्था स्थापन केली होती. तिथेही त्यांनी तीन नाटकांचे दिग्दर्शन करून वयोवृद्ध लोकांची पिकनिक ,गाण्याचे कार्यक्रम, दिवाळी पहाट असे अनेक उपक्रम राबवले. त्यांच्या मागे त्यांची पत्नी, मुलगा शशांक आणि मुकुंद आणि परिवार आहे.

# सरकार छत्रपतींच्या विरोधात जर असेल तर पूर्ण ताकदीने लढू

## खासदार सुप्रियाताई सुळे : छत्रपती शिवाजी महाराज ही दंतकथा नाही

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** आम्हाला जेलमध्ये जायला लागले तरी आम्ही जाऊ परंतु छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमान हा महाराष्ट्र सहन करणार नाही. जितेंद्र आव्हाड यासाठी जेलमध्ये जात असतील तर जितेंद्र आव्हाड यांचा आम्हाला अभिमान आहे आणि यासरकारने नक्की कुणाच्या बाजूने आहात याचे उत्तर दिले पाहिजे. तुम्ही छत्रपतींच्या विरोधात जर असाल तर स्पष्ट करा मग ही लढाई पूर्ण ताकदीने लढू असा स्पष्ट इशारा राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या खासदार सुप्रियाताई सुळे यांनी आज पत्रकार परिषदेत सरकारला दिला. या राज्यात चाललंय काय... जो चूक करतो त्याला पूर्ण माफी आणि एखादा आंदोलन करतो त्याला शिक्षा म्हणजे ब्रिटिश राज सुरू आहे का? असा सवालही खासदार सुप्रियाताई सुळे यांनी उपस्थित केला.



जितेंद्र आव्हाड हे लढवय्ये नेते आहेत. त्यांना चौकशीसाठी पोलीस स्टेशनला बोलावलं. त्यामुळे ते गेले त्यावेळी तिथे वरुन दबाव येतोय असं पोलीस सांगत आहेत. मला कुणावर आरोप करायचे नाहीत. दबाव येतोय त्यात पोलिसांची चूक नाही आम्ही सत्तेत असो अथवा नसो मला महाराष्ट्र पोलीसांचा सार्थ अभिमान आहे. मात्र त्यांच्यावर दबाव येतोय ही चर्चा नाकारता येत नाही हे एकूण घटनेवरून स्पष्ट होते आहे असेही खासदार सुप्रियाताई सुळे म्हणाल्या. ज्या कारणासाठी अटक होतेय म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजांच्या विरोधात चित्रपटात चुकीचं दाखवलं जात असेल आणि एखादी व्यक्ती विरोधात वेदना मांडत असेल आणि त्यासाठी त्यांना अटक होत असेल तर या अटकेचे मनापासून स्वागत करत असल्याचे खासदार सुप्रियाताई सुळे यांनी स्पष्ट केले.

जितेंद्र आव्हाड यांनी काय केले आहे. जे त्यांना डायरेक्ट अटक केली जात आहे. तुमच्या व्हिडीओमध्ये जितेंद्र आव्हाड मारामारी करताना दिसत नाही. ते हात बांधून उभे आहेत. ते सगळ्यांना गप्प रहा सांगत आहेत. गप्प राहणे हा गुन्हा व्हायला लागला आहे का या राज्यात असा संतप्त सवालही खासदार सुप्रियाताई सुळे यांनी केला. छत्रपती शिवाजी महाराज आमच्या वडिलांसारखे आहेत. आन बान शान छत्रपती शिवाजी महाराज आहेत. त्यामुळे छत्रपतींचा अपमान होत असेल तर हे दुर्दैवी आहे. सत्ता काबीज करण्यासाठी माणसाने पातळी किती सोडावी हे महाराष्ट्राला लाजवणारी गोष्ट आहे अशा शब्दात खासदार सुप्रियाताई सुळे यांनी नाराजी व्यक्त केली. कुठल्याही कलाकाराला त्याला जे वाटते ते बोलण्याचा मनमोकळा अधिकार आहे. त्याचे समर्थन करते. पण एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की ऐतिहासिक चित्रपट तुम्ही बनवता त्यावेळी (तुम्ही पेंटर आहात पेंटींग करा. काल्पनिक चित्रपट बनवा) छत्रपती शिवाजी महाराज ही दंतकथा नाहीय ती आमची ओळख आहे आमचा श्वास आहे असेही खासदार सुप्रियाताई सुळे यांनी ठणकावून सांगितले. छत्रपतींबद्दल तुम्ही चुकीची माहिती देणार असाल तर ते अयोग्य आहे आणि त्याचा विरोध केलाच पाहिजे. चुकीच्या माहितीआधारे विकृत दाखवू नका इतिहास खरा दाखवा असे आवाहनही खासदार सुप्रियाताई सुळे यांनी केले.

महाराष्ट्राचे इतिहासक आणि चित्रपटवाले यांची एकत्र चर्चा होऊन जाऊ दे परंतु छत्रपतींचा अपमान हा महाराष्ट्र सहन करणार नाही असा स्पष्ट इशाराही खासदार सुप्रियाताई सुळे यांनी दिला. 'गांधी' नावाचा चित्रपट या जगात आला ना... 'गांधी' हा सिनेमा उत्तम होऊ शकतो तर मग छत्रपतींवर असे का नवीन चित्रपट यायला लागले आहेत. विकृती करु नका. सत्य दाखवा सत्याला कुणाचा विरोध नाही. सत्यमेव जयते असेही खासदार सुप्रियाताई सुळे म्हणाल्या. छत्रपतींना न्याय आपण दिला पाहिजे हीच स्वाभिमानी महिला म्हणून माफक अपेक्षा व्यक्त करताना खासदार सुप्रियाताई सुळे यांनी शिवाजी महाराजांबद्दल चुकीचा इतिहास कोण दाखवेल त्याला छत्रपतींचे नाव घेण्याचा अधिकार नाही असे खडेबोल सुनावले.